


# ख्रिस्तायन

ई-अंक ख्रिसमस २५ डिसेंबर २०११

संपादक :- ख्रिस्तोफर रिबेलो

Designed by :- १वसई

ख्रिसमस सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शूभेच्छा

# अनुक्रमणिका :-


संपादकीय

करशील जे गरिबासाठी - ख्रिस्तवासी सी. बी. दोडती

ह्या नाताळात आपण नक्कीच भेटू- श्री. सायमन मार्टिन

संस्कृतीमय वसईची लोकगीते - श्री.मेलविन डाबरे

मेल्या आईची पोर - ख्रिस्तवासी मिल्टन दोडती

पाल्य संस्कार - श्री. सायमन फिलिप रॉड्रिग्ज

जबाबदार - श्री. ख्रिस्तोफर रिबेलो

साक्रामेंत की सोहळा महत्वाचा ? - रे. फा. ज्यो डिमेलो.

ख्रिसमस विशेष

हसू नका बरे!!!

आरोग्य पुरवणी

History of Christmas

प्रेम आणि वेडेपणा

कविता

श्री. सायमन मार्टिन

श्री. एमेल आल्मेडा

श्री. सुनिल सोकाळकर

सुविचार संग्रह

Happy New Year translated into almost any language


## संपादन साहाय्य :


सोलोमन रिबेलो

पिटर दोडती

संजय आल्मेडा

एमेल आल्मेडा

स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

मिल्टन परेरा

# संपादकीय

वसईतील ख्रिस्ती समाजाच्या नाताळ सणाला एक खास 'लोकल वसई टच' आहे. डिसेंबरच्या पहिल्या रविवारी आगमन काळाला सुरुवात झाली की आपल्याला नाताळ सणाचे वेध लागतात. मग खरेदी... आठवडा अगोदर गोठा तयार करण्यासाठी गावाच्या वेशीवर जमणारे तरुणांचे जत्थे...... घराघरातून येणारा करंज्या चकल्यांचा वास....गावागावात फिरणारा 'कॅरल सिंगिंग' चा ग्रूप व त्याबरोबर येणारा सांताबाबा... मिडनाईट मासची तयारी, नाताळ दिवशी गावात होणारे निरनिराळे कला क्रीडा कार्यक्रम..... सारे वातावरण कसे उल्हासदायक होत असते.....

प्रिय मित्रांनो, ९ वर्षा अगोदर आम्ही एक प्रयत्न केला होता, नाताळ अंक प्रकाशित करायचा. आपले हिंदू बांधव जसे दिवाळीच्या सणाला गोड़धोड फराळाबरोबर साहित्यिक फराळ म्हणुन जसे दिवाळी अंक काढतात तसा आपणही नाताळ अंक प्रकाशित केला तर..... मेहनतही भरपूर घेतली आम्ही, "no loss no profit" असा हा उपक्रम होता, खर्च निघेल एवढा पुरस्कर्त्यांचा सहभाग सुद्धा मिळाला पण प्रकाशना नंतर एका पुरस्कर्त्यांच्या माघारीमुळे पदरच्या पैश्यातुन खर्च भागवावा लागला त्या नंतर हिंमत झाली नाही. गेल्या वर्षी तो अंक स्कॅन करून आमच्या www.onevasai.com या साईटवर पुर्नप्रकाशित केला. त्याच वेळी यापुढे ऑनलाइन नाताळ अंक प्रकाशित करायचा आमचा मानस आम्ही नमूद केला होता.

आज वसई ख्रिस्ती समाजाच्या इतिहासात प्रथमच संपूर्णपणे ऑनलाइन असा नाताळ अंक आम्ही प्रकाशित करत आहोत. यापुढेही प्रत्येक नाताळ सणावेळी असाच साहित्यिक फराळ आपणासाठी पेश करायला आम्हाला आवडेल. आपल्या सहकार्याची आणि प्रतिक्रियांची आम्हाला अपेक्षा आहेत.

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!! Merry Christmas & Happy New Year.

**ख्रिस्तोफर रिबेलो**

# करशील जे गरिबासाठी

शेवटच्या विरार लोकलने नाझरेथ स्टेशनवर उतरला. रात्रीचे दहा केव्हाच वाजून गेले होते. नाझरेथने स्टेशनवरल्या दुकानातून दोन किलो तांदूळ खरेदी केले, सकाळच्या चहासाठी साखर, चहापावडर आणि मुलांसाठी खाऊ खरेदी केला. कावडीत सर्व जिनसा टाकल्यावर नाझरेथने खिशात हात घातला. दुकानदाराचे सर्व पैसे चुकते केल्यानंतर त्याच्याकडे फक्त दोन रुपये उरले. उद्याचा संपूर्ण दिवस त्या दोन रुपयांवर त्याला काढायचा होता. नाझरेथच्या तोंडावर चिंतेची छटा दिसू लागली. तो विचारांतच झपाझप पावले टाकीत घराची वाट चालू लागला.

पानभाटातला नाझरेथ हा एक गरीब पासवाला. चार वाडीत फिरून खोले-वावळी जमा करायचा आणि बाजारातून पाच-दहा रूपयांचा जेमतेम माल घेऊन तो मुंबईला जायचा. त्याच्या कावडीवर तो चार जिवांचे पालनपोषण करायचा. अंगावर एक मळकट, केळीचे डाग पडलेला सदरा. कमरेला तश्याच तऱ्हेचे जुनाट धोतर आणि डोकीवर ठिगळ पडलेली आणि रंग ओळखू न येणारी लाल टोपी. बोटभर दाढी वाढलेली. मुंबईभर भर दुपारी डांबरी रस्त्यावरून ओझे घेऊन अनवाणी फिरणारा नाजरेथ पैशाने व इस्टेटीने जसा अत्यंत गरीब होता तसा वृतीने देखील गरीब व नम्र होता. तो घरी आला त्यावेळी पानभाटातले सर्व लोक आपली जेवणखावण आटोपून गाढ झोपी गेले होते. नाझरेथच्या चंद्रमौळी घरात मात्र दिवा मिणमिणत होता आणि त्याची पत्नी व दोन लहान मुले डोळ्यात तेल घालून त्याची वाट पाहत बसली होती. स्वयंपाक अद्याप व्हायचा होता. नाजरेथच्या उद्याच्या मुंबईला नेण्याच्या मालाची बांधाबांध व्हायची होती. संसाराची अनेक कामे उरकायची होती. शेजाऱ्यापाजाऱ्यांची विश्रांतीची मध्यरात्र उलटत आली होती. त्यावेळी नाझरेथच्या घरात संसारजीवनाची पहाट होऊ लागली होती.

जेवणं आटोपून मुलं झोपल्यावर नाझरेथ आपल्या बायकोजवळ आला आणि खिशातली दोन रुपयाची नोट काढून तिच्या पुढे धरत म्हणाला " आज दोनुस रुपये वरले

मा दरी, उदयाव दी यावर भागव" ती दीङ्मूढ त्याच्याकडे पाहतच राहिली. दोन रुपयात उद्याचे बारा तास काढायचे........ कसं शक्य आहे?....... ती चक्रावून गेलेली पाहून नाझरेथचे ह्रदय द्रवले. तो मनात म्हणाला "आपण रात्रन दिवस इतके राबतो पण सुख अजूनही आपल्या वाऱ्याला उभं राहत नाही. जवळच निद्राधीन झालेल्या दोघा अश्राफ मुलांकडे पाहून त्याच्या डोळ्यात अश्रु उभे राहिले. त्यांना झोपायला नीट बिछाना नव्हता की पांघरायला घड पांघरूण नव्हते. कडाक्याच्या थंडीत त्यांनी पोटात पाय दुमडून घेऊन थंडीशी झगडत ती निद्रा घेत होती.

नाझरेथच्या डोळ्यात अश्रु पाहून त्याची पत्नी नाती वरमली. त्याच्या हातातील दोन रुपयाची नोट आपल्या हातात घेऊन बाजूच्या खाटेवर बसत म्हणाली " तुम्हाला दु:ख होवाते यी माला कळे नाय गा ! पण आपलो संसार यो लूळो पांगळो, कते सुदऱ्यासो ? परवा नाताळसो हण आलो. घरात अन्नाओ कण नाय ! पोरा आंगोर धड कपडा नाय! बँकेया हप्त्यायी नोटिस आले. यातने कहो मार्ग काड्यासों हांगा बरा ?....."

बायकोने वाचलेल्या भावी आपत्तीच्या पाढ्याची समंजस नाझरेथला कल्पना होतीच. त्याने यापूर्वीही ह्या येऊ घातलेल्या दारुण प्रसंगावर विचार केला होता पण अजून त्याला मार्ग सापडला नव्हता. आता बायकोने त्याच गोष्टीचा परत उल्लेख केल्यावर त्याचे विचार चक्र फिरू लागले. नाताळच्या सणासाठी आपल्यासारख्या कफल्लक माणसाने फार मोठा बडेजाव करायला नको आहे हे खरे पण शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांनी नवे कपडे केले की आपली मुलं रडत बसणारच. आजूबाजूला गोडधोड झालं की आपल्या मुलांना त्यांच्या तोंडाकडे पाहत ठेवणे कसे शक्य आहे? बरं... ह्या गोष्टी जरी आपण कठोर मनाने न करण्याचे ठरवून पचवल्या तरी बँकेच्या हप्त्याचे काय? गेल्या वर्षी म्हैस घेण्यासाठी नाझरेथने कर्ज घेतले होते पण दैव त्याला साथ न देऊ शकल्याने त्याची म्हैस दूध देऊ शकली नाही आणि त्याच्यावर दुष्काळात तेरवव्या महिन्याप्रमाणे सर्व कर्ज भरणे क्रमप्राप्तच झाले. त्या कर्जापायी त्याची संसार नौका दारिद्राच्या वादळात अधिकच गटांगळ्या खाऊ लागली होती. नाझरेथ व त्याची पत्नी नाती ह्यांनी ही बुडू लागलेली संसार

नौका सावरण्याचा हर तऱ्हेने प्रयत्न केला होता. पण ह्या नौकेला सुखाचा किनारा मिळण्याऐवजी क्षणोक्षणी आपत्तींच्या भोवऱ्यांनाच तोंड द्यावे लागले होते.

डोक्याला अधिक त्राण न देता नाजरेथने एक दीर्घ श्वास सोडला. धोतराच्या सोग्याने अश्रुचे थेंब पुसले आणि एक फाटकी वाकळ खाटेवर पसरवून त्यावर पडत तो बायकोला म्हणाला,

“ तू आत्ते जा कय मला हांगीला त्यावर मे मार्ग काढले”

नाती त्याच्या तोंडाकडे आश्चर्याने पाहतच राहिली, तिने डोकं चालवलं पण नाझरेथने कोणता मार्ग काढला आहे ह्याचे तिला आकलन होईना, शेवटी ती साशंक होऊन म्हणाली,

“ आपुन मार्ग काढणार कहो? आपल्या दरी नाय जमीन ना दागिने” ह्यावर नाझरेथ लगेच म्हणाला,

“ काय हरकत नाय. देवाने आपल्याला जा कय दिले त्यातनेस आपुन थोडा कमी करो आन वेळ भागवोन घेवो....”

आपला नवरा काय बोलतो हे नातीच्या अजूनही लक्षात येत नव्हते. विकण्यासारखे घरात काहीच नसता नाजरेथ असं काय म्हणतो हेच तिला कळलं नाही. तो गोंधळलेली पाहून तो पुढे म्हणाला “ आपल्या दरी दोन जनावरे हात, एक गाभण भय आन एक बैल, त्यापैकी बैलाई आपल्याला सध्या जरूरी नाय. तो विकोण टाको. लवकरूस भय वेली गा परत बैल घेवो....”

नाझरेथला हे सांगताना रडू कोसळत होते. कारण त्याने बैलावर पोटच्या पोरासारखे प्रेम केले होते. नातीला देखील ही कल्पना पसंत पडली नाही. कारण हा बैल पोसण्यासाठी तिने अनेक वाडीत फिरून चारा गवत आणून घातले होते. घरातील दोन पोरं आणि गोठ्यातला बैल हे तिसरे मूल असंच ती मानत आली होती. नाझरेथच्या ह्या

उपायावर उसळून म्हणाली, “ मे हाडा ये काडे केले आन रातीव दी केलो आन यो बैल पोहिलो तो मे विकोन देणार नाय...”

त्यावर नाजरेथ तिला समजावणीच्या भाषेत म्हणाला, “ये बग, रागाव नाका. आल्या प्रसंगाला तोंड दिला पाये. डोळो जर फुटाते हायेडे तर भुवय बाळ्गोन का फायदो हाय गा? मावली दे दे त्यावेळेला परत घेव,आते तो आपलो नाय.”

नाजरेथच्या समजावणीने नाती मान खाली घालून बसली.

बैल विकायचा बेत पक्का झाल्यावर नाझरेथने दुसऱ्या दिवशी पहाटेस गावातल्या आपल्या पाकू कोपातला बोलावण्यास मुलगा पाठवला. नाझरेथचा पाकू एक जीवश्च कंठश्च स्नेही. नाझरेथला अडीअडचणीत नेहमीच सल्ला मसलत देणारा त्याच्या कुटुंबाबद्दल आपुलकी बाळगणारा आप्त. आज त्याचाच सल्ला नाझरेथला हवा होता. पाकू घरी आल्यावर इकडच्या तिकडच्या गप्पा मारून झाल्यावर त्याने आपली कल्पना पाकुपुढे मांडली. नाझरेथ आपल्या गरिबीपायी या निर्णयाप्रत आलेला पाहून पाकुचे अंग शहारले. त्याने तू असे करू नको, आपण पैशाची कुठेतरी तजवीज करू असे सांगितले पण नाझरेथने मला कोणताही सावकार कर्ज देणार नाही आणि जर दिले तरी मी ते फेडू शकणार नाही असे हताश होऊन सांगितले. शेवटी पाकुचा नाईलाज झाला, नंतर त्यानेच गिराईक मिळवून नाझरेथचा खिल्लारी बैल पाचशे रुपयाला विकला. बैलाने ज्यावेळी गोठ्यातुन पाय काढला त्यावेळी नाझरेथ व त्याची पत्नी अक्षरशः ढसाढसा रडली. त्यांनी बैलाचे तोंड कुशीत घेतले आणि लाडक्या मुलासारखे कित्येक वेळा कुरवाळले.

पाकूने पाचशेच्या नोटा मोजल्या व नाझरेथच्या हातावर ठेवल्या. थरथरत्या हाताने नाझरेथने त्या तशाच पेटीच्या खणात ठेवल्या. त्या रात्री त्यांच्या घरात एक प्रकारची शोककळाच पसरली होती. कोणाही घरातल्या माणसाने त्या रात्री अन्नपाणी घेतले नाही.

नाताळ आता अवघ्या दोन दिवसावर आला होता. बँकेच्या हफ्त्याची मुदत देखील भरत आली होती. नाझरेथ रात्रभर ह्या पैशाचे कायकाय कारचे या विचारात होता. मुलांना कपडे आणि ह्या सणात एक घास सुखाचा आपण घालू ह्या विचारात तो बराच समाधानी झालेला दिसला. तो बायकोला म्हणाला. “ बँकेव हफ्तो भरलो गा रेलेल्या पैशात तू तुला वाटेदे ता कर. नाराज हवो नाका.”

“ अगा, जमीनिया पोटात आन देवाआ मनात का हाय ता आत्तेस आपुन हांगू शकणार नाय! धावोन धन काय मिळवो नाका”

नाझरेथला मात्र बायकोच्या ह्या म्हणण्याचा अर्थ उलगडला नाही. मध्यरात्रीचा सुमार. सारं पानभाट निद्रेच्या कुशीत दडलं होतं. नाझरेथ देखील सुखनिद्रेत आनंदाचे क्षण घालवीत होता. त्याची काळजी आता बऱ्याच प्रमाणात दूर झाली होती. ख्रिस्त जयंतीचे सुख सोहळे त्याच्या घरात देखील थोड्या प्रमाणात येऊ लागले होते. इतक्यात त्याच्या दारावर कुणाची तरी थाप पडलेली त्याच्या कानी आली. नाझरेथ झटक्यात जागा झाला. त्याने लगबगीने दार उघडले. पाहतो तर समोर पाकू कोपात उभा. येवढया अपरात्री पाकुला पाहून नाझरेथ मनात चरकला. त्याने नाझरेथला जी हकिगत सांगितली ती ऐकून तो पार हबकून गेला.

पाकुची पत्नी बाळंतपणासाठी प्रसूतिगृहात नेली होती. तिला फार मोठे कष्ट पडले होते. पाकुला नाझरेथच्या मदतीची अत्यंत जरूरी लागली होती. तो तसाच तडक पाकुच्या बरोबर दवाखान्यात आला. खूप लोक जमा झाले होते. रडारड चालली होती. पाकू तर पार गर्भगळीत झाला होता. बारा वर्षांनंतर त्याच्या पोती हे मूल आले होते. फार नवस सायास त्याना ह्या मुलासाठी करावे लागले होते. नाजरेथने डॉक्टरची भेट घेतली. डॉक्टरांनी एक तर मूल जगेल नाहीतर आई असे सांगितले. पण पाकुला दोघेही हवे होते. नाजरेथने डॉक्टरला विचारले, “ दोघेही जगणार नाहीत का?” त्यावर डॉक्टर म्हणाले, “ मुल आडवं आहे. ऑपरेशन करावे लागेल. पैसा आहे का?” नाझरेथ लगेच म्हणाला, “किती लागतील?” “निदान पाचशे रुपये तरी लागतील, आहे तयारी?”

“पाचशेच ना, हरकत नाही, करा अपरिशान.... झाड आन फळ दोनी मिळाला पाय...” नाजरेथने डॉक्टरला हिम्मत दिली. आणि पाकुच्या संमतीची वाट न पाहताच तो घरी धावला. त्यावेळी मध्यरात्र ओसरली होती. घरी त्याची पत्नी वाट पाहतच होती. तो तडक घरात शिरला, तिला न विचारताच त्याने पेटी उघडली, खणात ठेवलेल्या पाचशे रूपयाच्या नोटा उचलल्या आणि नातीची संमती न घेताच तडक वाऱ्यासारखा सुसाट हॉस्पिटलच्या दिशेने पळत सुटला. आकाशात निळा भोर शुक्र तारा उगवला होता. तो देखिल त्याच्या बरोबर पळत जात होता. नाझरेथचे लक्ष त्या ताऱ्यावर जाताच तो मनात म्हणाला. “ चल घेऊन चल लवकर मला बेथलेहेमला. आज नवा ख्रिस्त जन्माला येत आहे. त्याच्या भेटीसाठी मी नजराणा घेऊन जात आहे..... मी उतावळा आहे”......

## ख्रिस्तवासी सी. बी. दोडती

**(ख्रि. सी. बी. दोडती वसईतील एक ख्यातनाम कवि-लेखक, कंटक किरीट, वेदनेची वेल ई. काव्य संग्रह , सावट, मातीखालचा माणूस ई. कादंबऱ्या, केळफुलं, सागरलहरी सारखे कथा संग्रह अशी ग्रंथ संपदा मागे ठेवून ते 30 मार्च 2005 ह्या दिवशी आपल्यातून निघून अनंताच्या प्रवासाला निघून गेले आहेत. त्यांच्या ‘ सावट” ह्या कादंबरीस महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. ही कथा त्यांच्या केळफुलं ह्या डिसे. १९८६ मध्ये प्रकाशित झालेल्या कथा संग्रहातून घेतली आहे. त्यांच्या आत्म्यास ख्रिस्तायन तर्फे श्रद्धांजली.)**

# ह्या नाताळात आपण नक्कीच भेटू!

बेथलहेमाच्या बाळ जन्माच्या चर्च मध्ये आम्ही २९ ऑक्टो. २०११ च्या दुपारी तीन वाजता पोहचलो. जेवणं आटोपली आणि आम्ही आधी मेंढपाळाचे शेत ज्या ठिकाणी आहे त्या जागेला भेट दिली. याच जागेत रात्रीच्या वेळी काही मेंढपाळ शेतामध्ये वस्ती करून आपले कळप राखत होते. लांडग्याच्या दुनियेत झोपून चालत नाही. डोळ्यांत तेल घालून जागता पहारा ठेवावा लागतो. मेंढरं हेच मेंढपाळाचे सर्वस्व आसते. म्हणून शंभरातलं एकजरी मेंढरू हरवलं तरीही मेंढपाळ सैरभैर होतो. जो आपल्या मेंढरांवर पोटच्या गोळ्यासारखं प्रेम करू शकतो त्यालाच मेंढपाळ होता येते. हातात काठी, खांद्यावर घोंगडी, डोळे सदैव उघडे, चेहरा आणि सर्वांग उन्हात करपलेलं असूनही ज्याच्या काळजात कायम करुणेचा झरा वाहत असतो तो मेंढपाळ.

याच वेशीबाहेरच्या दीन, पददलित मेंढपाळांना प्रथम ख्रिस्त जन्माची सुवार्ता कळली. देवाच्या दूताला पाहताच त्यांची भीतीने गाळण उडाली. यापूर्वी त्यांनी असं दैवी रूप पाहिलं नव्हतं. त्या तेजाने त्यांचे डोळे दिपून गेले. त्यांच्यासाठी आनंदाची बातमी होती; बेथलहेमात प्रभू ख्रिस्ताचा जन्म झाला होता. त्याला ओळखायचं कसं? तर गाईच्या गोठ्यात निजवलेलं बाळ तुम्हाला आढळेल. मेंढपाळ बेथलहेमात जायला निघाले, तसं अंतर दूरचं नव्हतं पण ज्यांच्या डोळ्यापुढे तारा असतो तेच देवाच्या गावाला जाऊ शकतात.

हे जे शेत आहे ना याच शेतात निओमीची सून रूथ सरवा वेचायला जायची. रूथची कथा बायबलच्या जुना करार या पुस्तकात वाचायला मिळते. हेच ते बोॲजचे शेत. निओमीचा पती अलीमलेख व दोन्ही मुलगे महलोन व खिलियन मरून गेले. मागे उरल्या तीन विधवा. निओमी सुनांना म्हणाली, माझं राज्य उजाड झालं आता तुम्ही तुमच्या माहेरी परत जा. खिलियनची बायको अर्पा निघून गेली. महलोनची बायको रूथ सासूबरोबर राहिली नंतर दोघीही बेथलहेमात परत आल्या पुढे रुथचं बोॲजबरोबर लग्न झालं. रुथला मुलगा झाला. त्याचे नाव ओबेद. ओबेदला जेस्से झाला आणि जेस्सेला डेविड झाला. याच डेविडच्या घराण्यात येशू जन्माला आला .

बेथलहेमच्या पूर्व दिशेस तीन किलोमीटर अंतरावर बेथसाहुर या गावात मेंढपाळाचे शेत आहे. फ्रान्सिकन धर्मगुरूंनी मेंढपाळाच्या तंबूच्या आकाराचं सुंदर चर्च येथे बांधलेले आहे. आभाळासारखे छत आणि देवळातील भित्ती चित्रं अप्रतिम आहेत. या देवळात थांबावस वाटत होतं पण मन आधीच बेथलहेमात जाऊन पोहोचलं होतं. त्या आधी मिल्क ग्रोटो या देवळाला धावती भेट दिली. हा परिसर मागच्या दोन-चार वर्षात पार राजेशाही करून ठेवला आहे. माऊलीने बाळाला जेथे स्तनपान केलं त्या जागेवर हे चर्च उभे आहे.

बेथलहेमात ऑक्टोबरपासूनच संध्याकाळी पाच वाजता दिवस मावळतो. साडेपाचच्या दरम्यान सर्वत्र काळोख दाटून येतो. याउलट मे महिन्यात संध्याकाळी आठ वाजेपर्यंत दिवस रेंगाळत असतो. नॅटीव्हिटी चर्च, म्हणजे ख्रिस्त जनमाचे महामंदिर हे पवित्र भूमीचे भूषणच आहे. येथेच प्रभूने जन्म घेतला. ती आठवण म्हणून नाताळात आपण नाताळ गोठयाचा देखावा उभा करतो. तो परिसर कसा असेल याची आपण एक कल्पना केलेली असते. प्रत्यक्षात ती एक गुहा आहे. या गुहेभोवतीच पहिल्यांदा ३२६ मध्ये राजा कॉस्टेंटाईन ने चर्च उभारले. हे जगातले प्राचीन चर्च आहे. चर्चच्या समोर विस्तीर्ण आवार आहे. बेथलहेम शहर पॅलेस्टाइनच्या ताब्यात आहे. चर्चच्या समोरच पॅलेस्टाइनचं शांती केंद्र आहे. इस्त्रायल आणि पॅलेस्टाइनमध्ये चालत असलेला संघर्ष, त्यात पडणारी माणसांच्या प्राणांची आहुती; जगाला शांतीचा संदेश ज्या भूमिने दिला ती जमीन कायमच रक्ताने न्हाऊन निघालेली आहे.

ख्रिस्त जन्माचं चर्च बाहेरून बघताना एखादी छोटीशी गढीच आहे असा भास होतो. क्रोंसच्या आकाराच्या या चर्चमध्ये प्रवेश करताना पुर्णपणे वाकूनच जावे लागते, कारण मुख्य दरवाजा केवळ तीन फुट उंच आहे. आम्ही आतमध्ये प्रवेश केला तेव्हा चर्चच्या आतलं आवार माणसांनी खच्चून भरलेलं होतं. दर्शनासाठी जी रांग होती तिच्या शेवटच्या टोकाला आमचा नंबर होता. साऱ्या विश्वातल्या मंडळींचा त्यात समावेश होता. रांग मुंगीच्या पावलाने पुढे सरकत होती. दिवसभरच्या थकव्याने ज्यांना रांगेत उभं राहता येत नाही अशी जेष्ठ मंडळी बाजूला जाऊन विश्रांती घेऊ पाहत होती. पण ज्यांच्याकडे चर्चचा कारभार आहे ते ग्रीक ऑर्थडॉक्स पंथाचे धर्मगुरू त्यांच्या अंगावर वसकन धावून येत होते.

पायाला रग आलेली पण दर्शनाची ओढ लागलेली होती. तुझा जन्म झाला म्हणून आमचं निभावलं नाहीतर आमचं काही खरं नव्हतं. ईश्वराच्या कृपेने इस्त्रायलची तीन वर्षातील ही माझी आठवी खेप होती पण या देवळात प्रत्येक वेळेला नित्य नवा अनुभव आलेला आहे.

येथली पहिली भेट जगावेगळीच होती. असेच संध्याकाळच्या वेळेला आम्ही देवळात पोहोचलो होतो. तेव्हा देखील तमाम गर्दी होती. हळूहळू एकेक पावलाने आम्ही तुझ्या दारा पर्यंत येत होतो. चर्च मध्ये सर्वत्र झुंबरं टांगलेली आहेत. दाढी वाढलेले, लांब केसाचे ग्रीक ऑर्थडॉक्स पंथाचे धर्मगुरू इकडून तिकडे सैनिकासारखे फिरत असतात. तुला यातलं काही मान्य झालं नसतं.

कधी एकदा तुझं जन्म स्थळ पाहतो असं झालेलं. गाई ज्या गुहेत बांधलेल्या होत्या त्या गव्हाणीत तुला बाळंत्यात गुंडाळून ठेवलेलं होतं असं वाचता यायला लागल्यापासून बायबलमधून वाचत आलोय. मंदिराच्या पायऱ्या उतरून एकदाचा त्या गुहेत प्रवेश केला. ही अंधारी गुहा आहे. मेणबत्त्या पेटलेल्या होत्या. त्या धूराने गुहेच्या भिंती काळपट झालेल्या होत्या. जेथे तुला निजवलेलं होतं त्या जागेला स्पर्श केला आणि माझं सर्वांग शहारून गेलं. विश्वासच बसला नाही की तुझ्या गावात, जेथे तुझा जन्म झालाय त्या जागेवर मी उभा आहे. तब्बल तीस वर्षापासून मी तुझ्या कविता लिहितो आहे. प्रत्येक नाताळात जन्माची गाणी माझ्या कानात रुंजी घालायची. प्रत्येक शुभ शुक्रवारी, मला शोकगीत ऐकू यायची. तेव्हा वाटायचं तू असा अवेळी क्रुसावर गेला नसतास तर माझा गळा दाटून आला नसता. तुझा अनुभव यावा, तुझा स्पर्श व्हावा, तुला भेटता यावं म्हणून किती आटापिटा केलेला आहे.

आणि त्या दिवशी मी प्रत्यक्ष तुझ्या घरात उभा होतो. हा क्षण धरून ठेवता आला असता तर? संपूर्ण ओणवा झालो. ओठ जेथे तू निजलेला होतास त्या पत्थरावर टेकले. माझ्या नकळत माझे डोळे वाहू लागले. संपूर्ण चेहरा अश्रुंनी भिजून गेला. तुझ्याशी आतापर्यंत आसव्याच्यांच भाषेत बोलत आलेलो आहे.

क्षणभर त्या अंधाऱ्या गुहेतलं काहीच दिसलं नाही. हाच क्षण होतं तुझ्या अस्तित्वाची जाणीव होण्याचा. तू आहेस, तू आमच्या बरोबर आहेस हा विश्वास त्या एका क्षणा ने दिला. तेथून पाय निघत नव्हता. काही क्षण ध्यानस्थ बसून राहावसं वाटत होतं.

पण ते शक्य नव्हतं. जड पावलानं तुझ्या घरातनं पाय उतार झालो. तू माझ्याकडे पाहतो आहेस हे मला ठाऊक होतं. तुला सोबत घेऊनच बाहेर आलो. देवळा बाहेरचा परिसर काळोखाच्या कवेत लपेटलेला होता. क्षणभर काहीच बोलू नये असं वाटलं. कारण शब्द संपून मौनाचा प्रदेश सुरू झाला होता.

मेंढपाळ भाग्यवानच होते कारण त्यांना सर्वा आधी तू आल्याचं कळलं होतं. जे जागरण करतात त्यांनाच देवाचे दर्शन होते. दिवस सर्वकाही उघडं करून पुढयात ठेवतो. रात्रीत मात्र सर्वप्रकारची रहस्यं दडलेली असतात. ती शोधून काढावी लागतात. त्यासाठी डोळे बंद करून चालत नाही. मनात विचारांची गर्दी उसळली होती. मन शांत होण्या ऐवजी अधिकाधिक बेचैन झालेलं होतं. एकदा भेटून समाधान झालेलं नव्हतं. पुन्हा पुन्हा भेटावं लागणार होतं.

मी माझ्या घराचे दरवाजे उघडे ठेवलेले आहेत. तू येशील तेव्हा बंद दरवाजा पाहून माघारी जाऊ नयेस म्हणून जागता पहारा ठेवलेला आहे माझ्यावरच. या नाताळात आपण नक्कीच भेटू.

## श्री. सायमन मार्टिन, भुईगाव

**(श्री. सायमन मार्टिन हे वसईतील नामवंत कवी-लेखक आहेत, सुवार्ता मासिकाचे ते अनेक वर्षे उपसंपादक होते. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सध्या "निरोप्या" या मासिकाच्या संपादकाची मोठी जबाबदारी त्यांच्या शिरावर आहे.)**

# संस्कृतीमय वसईची लोकगीते

संस्कृती म्हणजे मानवी समाजाचा आंतरिक विकास. परमेश्वराने सर्वांग सुंदर असे विश्व निर्माण केले आणि या विश्वात मानवाला सर्वोच्च स्थान दिले. मानवाने आपल्या भुद्धीच्या जोरावर आपला ठसा आजूबाजूच्या निसर्गावर व परिसरावर उमटविला. अनेक शोध लावले, अनेक तत्वे त्याने शोधली, आपले जीवन अधिक आकर्षक नि सुंदर करण्याचे अनेक मार्ग अवलंबिले, त्यातुणा शास्त्रांचा विकास झाला. अनेक कला उदयास आल्या व या कलेतून मानवाने जीवनाचा अनुभव घेतला. वेगवेगळ्या श्रद्धा त्याने जोपासल्या, जगण्याच्या अनेक पद्धती निर्माण केल्या, त्यातून त्याची जीवनदृष्टी रुंदावली; त्यातून उत्तम आदर्श निर्माण झाले आणि वेगवेगळी मूल्ये विकसित झाली. हीच खरी संस्कृती होय.

***<u>संस्कृती संपन्न वसई</u>***

जगत जे-जे काही सत्य, शिवम व सुंदरम दिसेल ते-ते घेवून वाढणारी संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती व भारतामध्ये असलेल्या अनेक संस्कृतीपैकी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती म्हणजे वसईची संस्कृती होय.

वसईचा इतिहास सर्वज्ञात आहेच. पूर्वेला पर्वत रांगा, पश्चिमेला अरबी समुद्र व किल्ले, दक्षिणेला केळीच्या व नारळा-पोफळीच्या बागा आणि उत्तरेला वैतरणा नदी अश्या या निसर्गाच्या, समुद्राच्या नि डोंगरकपारींच्या सानिध्यात वसलेली वसई व या वसईत राहणारे आपण सर्व वसईकर.  आज वसईत आदिवासी, कोळी, कुपारी, आगरी, भंडारी, वाडवळ, वलकर, पाठारी, मानकर, पूरकर, ब्राम्हण, सामवेदी, सोमवंशी, शेषवंशी, गोरक्ष, पाचकळशी, चोकळशी असे सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत आहेत आणि प्रत्येकाच्या संस्कृतीचे एकमेकांमध्ये मालूम-बेमालूम मिश्रण झालेले आहे.

***<u>वसईची लोकगीते : समाजाचा आरसा</u>***

कोणत्याही समाजाचे यथोचित दर्शन हे त्या समाजाच्या लोकगीतातून घडते. माणसाने आपल्या बोलीभाषेत सहज स्फूर्त अशी जी प्रसंगानुरूप विविध गीते

रचली, ती म्हणजे लोकगीते होत. जिव्हाळ्याचे विषय, विशिष्ट भूप्रदेश, नैसगिक वैशिष्टे, समाजातील आचार-विचार, संस्कृती, शिक्षण, सण, उत्सव, चालीरीती, इतिहास, सामाजिक परंपरा, धर्म, सुखदु:खे, वेगवेगळ्या रसमय भावना यांचे चित्रमय प्रतिबिंब लोकगीतातून दिसून येते. म्हणूनच असे म्हटले जाते. मानवी संस्कृतीचा प्रत्यक्ष, ऐतिहासिक व सांस्कृतिक पुरावा म्हणजे लोकगीत होय.

वर उलेखिल्याप्रमाणे वसईत पूर्वीपासून राहणाऱ्या सर्व समाजाच्या संस्कृतीचे दर्शन तीनच्या लोकगीतातून होत असते. समाजातील चालीरीती, सुखदु:खे, यांना खांद्यावर घेवून ही लोकगीते भूतकाळातून वर्तमानानाकडे वावरताना आढळतात. त्यांची जडणघडण, प्रवाही शब्द रचना, डौल व बाळबोध स्वरांचा लयींवर झालेला तालबद्ध आविष्कार कोणाही रसिकाचे कान तृप्त केल्याशिवाय राहत नाही.. या लोकगीतातून अनाम रचनाकारांच्या प्रतिभेचा व प्रगल्भतेचा आविष्कार दिसून येतो.

आजीने नातवंडांना झोपाळ्यावर बसवून गायलेली अंगाई गीते, दूर सासरी जाताना नववधूच्या आंतरील ताटातुटीची गीते, बहवाच्या सुखासाठी हपापलेली बहीण, सासरचा आदर व माहेरची ओढ यांचा मनोरम संगम, भूतकाळाची आठवण करून देणारी भावनाप्रधान गीते, शेताबांधावर कष्टाची कामे करणाऱ्या कष्टकऱ्यांचे श्रमपरिहार करण्यासाठी  गायलेली गीते, माहेर व सासरच्या लोकांची खिल्ली उडविणारी विनोदी गीते, तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असलेल्यांसाठी रचलेली प्रणयगीते, सणावारांचा आनंद द्विगुणित करणारी गीते ह्या सर्वांमधुन शब्द, सुर, लय, व ताल यांचा सुंदर मिलाफ झालेला दिसून येतो.

## ***<u>गीतांचे वर्गीकरण</u>***

वसईच्या संस्कृतीवर आधारित लोकगीतांचे साधारणत: पुढीलप्रकारे वर्गीकरण करता येते

***<u>अंगाई गीते</u>*** **:-** घरच्या ओटीवर असलेल्या लकडी हिंदोळ्यावर घरातील आजी वा आई बाळाला झोपवण्यासाठी ही गीते गात असत, सगळ्याच लोकभाषेत आंगाई गीते आढळतात.

**उदा.:-** येला तू गाये, गाये गो निजबाये, बाळू माझा लाना, साव झुजे इरजे मरी, पाणी पडे दे इत्यादि...

***<u>सणावाराची गीते</u>*** **:-** वसईत अनेक जाती-धर्माचे-वंशाचे लोक राहतात व या सर्वांमध्ये येणाऱ्या सणावाराला विविध गीते गाऊन सणाचा आनंद द्विगुणित केला जातो.

**उदा.** अगो माझे बारजे, माय मी सणाला जातय गे ई.

***<u>बडबड गीते</u>*** **:-** वेळ घालवण्यासाठी व लहान भावंडांना खेळवून हसत ठेवण्यासाठी ही गीते गाईली जात असत.

**उदा. :-** यारे पोरांदो खेळायला, आंब्योरसौं आंबों पडलों, ये रे बापा आपल्या घरा ई.

***<u>भक्ती गीते</u>*** **:-** समाजाचे शरीर मानवी नात्यांनी घडलेले असते तर समाजाला आत्मा घडवित असतो त्याचा धर्म व त्याची व त्याची ईश्वर शरणता. ही भक्ती गीते समाजाची ईश्वराप्रती असलेली श्रद्धा व नम्रता व्यक्त करतात.

**उदा.** मावली नऊ मयने गरभार, रमेदाये आये, सांदुले उंगियले ई.

***<u>विवाह गीते</u>*** **:-** वसईतील काही समाजात लग्न कार्याच्या एक-दोन महीने आधी गावातील स्रिया रात्रीचे जेवण झाल्यावर एकत्र येऊन वधूच्या वा वराच्या घरी ओटीवर असलेल्या हिंदोळ्यावर बसून विवाह गीते गात असत. या गीतांतून वातावरण निर्मिती होत असे तसेच आनंद व्यक्त होत असे.

**उदा.** आले गे राती, दातुरश्या तरीवरी, माथ्यान फूल दुये, बांगडी टिचली गो ई.

***<u>नाती दर्शविणारी गीते</u>*** **:-** आई-बाप, भाऊ-बहीण, मामा-मामी, सासू-सासरे, पती, नणंद, मदरीन-पदरीन ह्या नात्यामागच्या वेगवेगळ्या भावना अश्या गीतांतून व्यक्त होतात व या गीतांमधून सर्वांप्रती असलेली माया, प्रेम क्वचित असूयाही व्यक्त होत असे.

**उदा.** मामा मामी कडे गेली, सांदा रे पयल्या सांदा, एक निरोप पाठव्योतों, वेलू न वेलू, भावा बंदवासे ई.

***<u>शृंगार गीते</u>*** **:-** तरुण आणि तरुणी आपल्या पुढील आयूष्याची स्वप्ने रंगवतात व ह्या स्वप्नांचे वर्णन अश्या लोकगीतातून आढळते.

**उदा.** लाल लाल गाल, सय गो सय, रिमझिम पाऊस पडते, गल्यान साखळी सोन्याची, वैशाखाली निंबर ई.

***<u>निसर्ग गीते</u>*** **:-** वसईचा निसर्ग हा सृष्टीसौंदयाने नटलेला, मधुर फुला-फळांनी, भाताच्या सोनेरी पिकांनी डोलणारा, नारळी-पोफळीच्या बागांनी बहरलेला व सर्वांना आकर्षित करणारा आहे व त्याची मनमुरादपणे वर्णन करणारी असंख्य लोकगीते आहेत. ह्या लोकगीतांतून निसर्ग व मानवाचे नाते किती अतूट आहे ह्याची प्रचिती येते.

**उदा.** बागे सभोवती, ऊठ माळ्या, मोगरा फुलयला, दर्याश्या किनारीला, आंबा बाय लाविला ई.

***<u>विरह गीते</u>*** **:-** आपल्या रक्ताचे नातेवाईक सोडून परघरात नांदायला निघालेल्या नवविवाहितेचा विरह तसेच सासरी गेलेल्या मुलीला आपल्या माहेरची लागलेली ओढ, मुलीच्या जाण्याने शोकाकुल झालेले कुटुंबिय ह्या सर्वांचे हृदय स्पर्शी वर्णन या लोकगीतांतून केलेले आढळते. ही गीते गाताना व ऐकताना डोळ्यातून अश्रु ओघळल्याशिवाय राहत नाही एवढी ताकद या लोकगीतांत आहे.

**उदा. :-** नवरिशे आये गे, दुये सासऱ्या जात्या वेळे, डोंगरान मोर, झोपाळ्यावर बैसू, आजपासून खपल ग दुये, एक बांगडी शिनाय कोंबडी ई.

***<u>कष्टकऱ्यांची गीते</u>*** **:-** वसईचा समाज हा कष्टकरी समाज, शेतात, वाडीत राबणारा. या समाजाचे नाते जमीन व शेती-वडीशी पक्के जोडलेले आहे. पुरुष-स्रिया दोघेही वरील कष्टाची कामे करीत असत. अश्यावेळी क्षीण घालवण्यासाठी व विरंगुळा म्हणून काही लोकगीते रचलेली आढळतात, यातून आनंद मिळतो व परिश्रमांची सार्थकता जाणवते.

**उदा.:-** शेतकरी आम्ही शेतकरी, मुंबय जाता माझ्या ई.

***<u>इतर गीते</u>*** **:-** अश्या गीताव्यतिरिक्त लग्नाच्या एक दिवस आधी म्हणजे शिवारी वड्यांसाठी पीठ तसेच वडे काढताना गायलेली गीते, नवरा-नवरी लग्न संस्कार घेऊन घरी येतात तेव्हा म्हटलेली गीते, नावारीला दुसऱ्या दिवशी सासरुन माहेरी आणण्यासाठी रचलेली गीते, सासर व माहेरच्या लोकांची चेष्टा मस्करी करणारी गीते, संयवारी पानाची गीते अश्या विविध भगत लोकगीतांचे वर्गीकरण करता येते.बहुतेक गीते ही स्रीप्रधान

आहेत. त्यामानाने पुरुषप्रधान गीतांचा अभाव जाणवतो. ही गीते कोणी रचली असावीत याविषयी शंकाच आहे. तसेच ही गीते कधीपासून आली? हयाचेही उत्तर सांगता येणार नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने ही गीते संक्रमित झाली आहेत. मात्र ही संक्रमित होत असताना त्या गीतांमध्ये बराचसा बदल झालेला दिसून येतो.

***वसई :आज***

आज वसईकरांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या, मेहनतीच्या, कर्तृत्वाच्या जोरावर सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केलेली आहे. शिक्षण, कला, राजकारण, अर्थ, साहित्य, विज्ञान , आरोग्य, व्यवसाय, धर्म, प्रबोधन, संशोधन अश्या सर्वच बाबतीत वसईकरांनी उंच भरारी मारलेली आहे. केवळ वसई व भारतातच नव्हे तर सातासमुद्रापलीकडेही वसईकरांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली आहे. मात्र या प्रगतीबरोबरच आधुनिकीकरण, जागतिकीकरण, व पाश्चिमात्यकरण या त्रयींमध्ये वसईकर हरवत चालला आहे. वसईत लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत. वसईचे हिरवेपण नष्ट होत आहे, वसईचे रूप विकृत होत आहे व त्याचबरोबर ज्यामधून वसईच्या भूतकाळचे दर्शन होते, वसईच्या निसर्ग सौंदर्याचे , साहित्य-कला-संस्कृती चे दर्शन घडतेयाशी श्र्वांनीय, माधुर्यमय, अर्थपूर्ण व भावपूर्ण पारंपारिक लोकगीते देखील नामशेष होताना दिसत आहेत. आजची तरुण पिढी पाश्चिमात्य संगीताचा पगडा असलेल्या फ्यूजनमय , रीमिक्स व काहीष्य अश्लील व विकृत गीतांकडे आकर्षित झालेली आहे त्यामुळे संस्कृती रक्षक अश्या लोकगीतांचा त्यांना विसर पडलेला आहे. किंबहुना अश्या गींताचा त्यांना परिचयही नाही.

सारे जग बदलत आहे त्याबरोबर वसईतील समाजही बदलत आहे. वसईचा हा समाज विखुरलेला आहे. इतरांबरोबरचे त्याचे दैनंदिन व्यवहार वाढलेले आहेत. इतर समजतील आचार-विचार, रूढी-परंपरा, चालीरीती, , रोटी-बेटी व्यवहार, आहार-पेहराव ,, व्यवसाय, सण-समारंभ–उत्सव, साजरा करण्याच्या पद्धती , तों आपलेसे करू लागला आहे, त्यामुळे सर्वच बाबतीत मिसळ झालेली आहे.

अश्या ह्या सुमधुर, आल्हाददायक तसेच विविध भाव-भावनांनी व रसांनी भरलेल्या लोक्गीतांमध्येही फरक पडलेला आहे. कालची गीते व आजची परिस्थिती यांची

कुठेच सांगड जमात नाही. घुमतसारख्या गोड व मंजुल वडणाची जागा डी जे सारख्या कर्कश साधनाने घेतलेली आहे. हिंदोळा, ओटी, पाळणा, गावकऱ्यांचा मंडप, त्या मंडपाला आंब्याची पाने, केळीची पाने, वड्यासाठी पीठ टाकताना तसेच वडे काढताना गाईली जाणारी गीते,, नवारीला माहेरी आणताना गायली जाणारी गीते, रविवारी लग्न संस्कारानंतर नवरीच्या घरी गाली जाणारीधांल गीतेवधूच्या वेशीवरचे तोरण हे सर्व नष्ट होत आहे किंबहुना झालेलच आहे.

असे असले तरीही ध्वनिफित, सी डी च्या मद्यमातून वसईची लोकगीतेवा त्या गीतांतून साकार होणारी वसईची संस्कृती टिकवण्याचा प्रामाणिक प्रयत्न अनेक वसईकर करीत आहे हे ही नसे थोडके! आपण देखील एक वसईकर या नात्याने आपल्या वसईच्या संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी पाऊले उचलू या.

## मेलविन डाबरे, सालोली-गिरीज

**(श्री. मेलविन डाबरे, सेंट अॅलॉयशीयस डी. टी. एड. कॉलेज, पापडी येथे अध्यापकाचार्य आहेत. अनेक लोकगीते, धार्मिकगीते, भावगीते, बालगीते यांच्या सी. डी.चे निर्माते, वसईकर या लग्नगीताच्या सी. डी. चे चार भाग प्रकाशित केले आहेत तसेच संगीत हया विषयावर पुस्तक लिहिले आहे. वेगवेगळ्या एकांकिका, पथनाट्य असे अनेक उपक्रम त्यांचे सतत चालू असतात)**

# मेल्या आईची पोर

शनिवारचा दिवस... पहाटे अदमासे सातचा सुमार... नायगाव स्टेशनवरून पूर्वेला रिक्षा पकडण्यासाठी माझी पाऊले चाललेली, हातात छत्री... बाहेर धुवांधार पाऊस... सोबत वाऱ्याचा बलदंड जोर... पाऊसवाऱ्याच्या तालावर छत्रीचा टोल सांभाळता सांभाळता नाकी नऊ येत होते. सर्वांग ओलेते झाले होते... रिक्षास्टँडवर आलो. हायवेला जाणाऱ्या रिक्षात बसलो. बाजूला दोन स्त्रिया बसल्या होत्या, पाच प्रवाशी बसल्याशिवाय रिक्षावाला रिक्षा सोडणार नव्हता....

मी येण्याच्या काही काळ अगोदर त्या बाया येऊन बसल्या होत्या.... एकेक करून पाच प्रवाशी जमणार होते.. एवढ्या पहाटे कोणी येणे अमंल कठीण होते. रिक्षावाला 'दैनिक वार्ताहार' वाचत होता. प्रवाशांची वाट पाहण्याशिवाय दूसरा तरणोपाय नव्हता. बाहेर पावसाचा जोर अद्याप ओसरला नव्हता. रिक्षाच्या छतावर कोसळणाऱ्या पाऊस धारांचा निनाद त्या नीरव शांततेला बाधा आणू पाहत होता. रिक्षात बसलो असता त्या कुंद वातावरणात धुंद होत ओवी ओठांवर रेंगाळू लागली...

पाऊस पडतो l पडतो मुसळधार
नदीला आला पुर l दोन्ही थडी

काही काल असाच गेला. हायवेला जाणार का ? म्हणून चौकशी करत एक प्रवाशी आला. रिक्षावाल्याचा होकार मिळताच त्याच्या बाजूला बसला. पावसाने त्यालाही सोडले नव्हते. तो ही बऱ्यापैकी ओला झाला होता.

चला, शाळेला उशीर होतोय, पाचवा पेसेंजर पुढे भेटेल." काहीशी अस्वस्थ होत माझ्या बाजूला बसलेल्या त्या दोन बायांपैकी एक बाई उदगारली. बहुदा ती शाळामास्तरीण असावी. नाही हो, बाई, चार पेसेंजर घेऊन रिक्षा सोडणे परवडत नाय. इथे स्टेशनात रिक्षास्टँडला पेसेंजर मिळत नाय, तर पुढे काय कपाळ मिळणार? आता ह्या गाडीला पेसेंजर येतीलच की. रिक्षावाल्याचा मुंहतोड जवाब.

आता पावसाचा जोर खरेच कमी झाला होता.  हायवे एक प्रवाशी चौकशी करीत होता. आता कुठे हायसे वाटले.  पाच पेसेंजर झाले एकदाचे' मी नि:श्वास  टाकला.

साहेब, तुम्ही जरा पुढे येताय का?, पेसेंजरच्या हातात खूप बारीक पोर हाय. रिक्षावाला मला विनंती करत होता. रिक्षाला लावलेला पडदा बाजूला सारात मी मान बाहेर काढली. बाहेर पस्तीस-चाळीस वर्षाचा एक इसम उभा होता. पांढरपेशा समाजातला असावा असे स्वकृत दर्शनी वाटत होते.दाढीचे झुंत बऱ्यापैकी वाढलेले... चेहऱ्याला बऱ्यापैकी मरगळ आलेली.... गेली दोन रात्री त्याला व्यवस्थित झोप मिळालेली नसावी.. डाव्या हातात छत्री व उजव्या हातात कपड्यात गुंडाललेले अर्भक... मी बाहेर आलो. त्याला माझी जागा दिली. रिक्षावाल्याने कीक मारून रिक्षा स्टार्ट करताच त्याच्या बाजूला पुढे बसलो. प्रवास सुरू झाला.

अरेरे, किती छोटे मूल ! ह्या पावसात कुठे घेउन चालला आहेस? किती दिवसाचे आहे हे बाळ ? मुलगा की मुलगी? शाळा मास्तरीनने त्याची जणू हजेरी घ्यायला सुरुवात केली.

तीन दिवसाची मुलगी आहे. नातेवाईकांकडे चालवली. त्याचे उत्तर.. तुम्ही कशाला चालवली?" अन या बाळाची आई कुठे आहे  एवढा वेळ शांत बसलेली ती बाई बोलली. मेली ती, वरती गेली...हिला जन्म देऊन गेली... कायमची. बोलताना त्याचा कंठ दाटून आला होता. चेहरा कासणूसा झालेला... बराचसा रडवेला झालीला.

मजल दरमजल करीत प्रवास सुरू होता. मागे बसलेल्या त्या दोन बायांनी त्या मेल्या आईच्या पोरीच्या बापाची जणू मुलाखातच घ्यायला सुरुवात केली. प्रश्नांची सरबत्ती सुरू होती. माझी ही उत्सुकता कमालीची वाढल्याने रिक्षावाल्याने सुरू केलेली कारटेप बंद करण्यास सांगून मी ही त्यांच्या बोलण्याकडे एकाग्रतेने अवधान देऊ लागलो. बरीच माहिती पडत होती...

तो मूळचा गुजरातमधला. वयाच्या सातव्या वर्षी गाव सोडून तो वडिलांबरोबर वसईत आला होता. जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत सातवी पर्यंत क्षिशण घेत्ल्या नंतर त्याने जी शाळा सोडली ती पण कायमची. दरम्यान त्याचे पितृछत्र हरवले. अनाथ, पोरका झालेला तो मुळीच, डगमगला नाही. परिस्थितीशी झुंज देण्याची हिंमत तो राखून होता. प्रथम कुठल्याशा लोंरीवर बिगारी म्हणून राहिल्यानंतर तो गवंडी काम शिकू लागला. नंतर तो कंत्राट दार बनला. हाताखाली काही मजूर काम करू लागले. तसे दिवसही हळूहळू बदलू लागले. स्वत:ची खोली घेऊन राहू लागला. दरम्यान त्याची नजर

शेवंतावर पडली. तिचीही त्याच्यावर पडली. नजरांना खीळ बसू लागली. मनोमिलन झाले. आता वरच्यावर गाठीभेटी होऊ लागल्या. प्रेमाचे रेशमीबंध घट्ट विणले जाऊ लागले. निराशेचा घनदाट काळोख दूर होऊन आशेच्या सूर्याने त्याच्या जीवनाच्या दशदिशा तेजाळून ठेवल्या होत्या. आट त्याला कसलीच क्षिति नव्हती. 'सुख मागू किती' असे त्याला झाले होते. एखादा चांगला दिवस पाहून शेवंताशी लग्न उरकावे असा मनसब आखताना दुधात विरजण पडावे तसे काहीसे वितुष्ट निर्माण झाले. शेवंताच्या घरच्याकडून लग्नाला कडाडून विरोध झाला. जात आडवी आली., धर्म आडवा आला. शेवंताशी प्रेम करीत असता हा विचार त्याच्या मनाला तसूभरही शिवला नव्हता. तो अमंल निराश झाला, मात्र डगमगला नाही. त्याने पळून जाऊन लग्न केले. अपमान होईल हे गृहीत धरूनही तो शेवंताच्या माहेरी तिच्या आईवडिलांचा आशीर्वाद मागण्यासाठी तिला घेऊन गेला. ती यायला तयार नव्हती. कदाचित आपल्या आईवडिलांच्या स्वभावाची नस न नस ती ओळखत असावी. व्हायचे तेच झाले, नाही नाही ते बोलणे ऐकून त्यांचे कान विटले. अपमानस्वरूपी विषाचा कडवट घोट प्राशन करीत ते उभयंता खोलीवर परतले. आता पुन्हा माहेरी जायचे नाही अशी शेवंताने शपथ घ्यायला लावली. शपथ घेताना स्वतःच्या डोक्यावर त्याचे हात ठेवले.

सुखाचा संसार सुरू झाला. शेवंताच्या सान्निध्यात तो बेसुमार खुष होता. तीही त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करीत होती. अशातच तिला दिवस गेल्याचे समजताच त्याला गगन ठेगणे झाले. तो तिची विशेष काळजी घेऊ लागला. तिच्या सर्व आवडी-निवडी जातीने पुरवू लागला. होणाऱ्या अपत्याविषयी स्वप्ने रंगवू लागला. मुलगा वा मुलगी विषयी त्याचा स्वतःचा असा कुठलाच आग्रह नव्हता. ईश्वराने दिलेल्या प्रसादाचे भविष्य उज्ज्वल कसे करता येईल, याच्या तो योजना आखू लागला होता., त्यासाठी तो अधिक मेहनत करायलाही तयार होता.

प्रसूती कळा असह्य होताच त्याने तिला सरकारी हॉस्पिटलमध्ये नेले. शेवंताने एका गोंडस मुलीला जन्म दिला होता. मात्र ह्या मुलीला वाढवण्यासाठी, तिला आपल्या उराचा पान्हा देण्यासाठी, तिला अंगाई गाऊन, झोपाळ्यात झुलवून झोपवण्यासठी ती राहिली नव्हती. प्रसूती वेदनेच्या कळा असह्य झाल्याने व खूपच रक्त स्राव झाल्याने तिने प्राण सोडला होता. तिथेच त्या सरकारी हॉस्पिटलमध्ये तो हमसाहमशी रडला होता... ती अजाण पोरही रडली होती.

स्वतःला आवरत सावरत त्याने तिच्या कलेवरला शांतपणे अग्नी दिला. बरीचशी मित्रमंडळी हळहळत त्याचे सांत्वन करू लागली होती. नियतीने त्याच्यावर खूप मोठा आघात केला होता. त्याचे अवघे भाव विश्व कोसळून गेले होते. त्याला कमालीचे आश्चर्य तितकाच संताप येत होता तो एकाच गोष्टीचा; शेवंताच्या माहेरचा कोणीही तिथे फिरकला नव्हता. कोणालाही तिचे अंत्यदर्शन घ्यावेसे वाटले नव्हते अगदी तिच्या जन्मदात्या आई-वडिलांनाही.

आता हे मेल्या आईचे पोर सांभाळायचे कसे? ह्या गहन प्रश्नाची उकल त्याला होत नव्हती. शेवंतावरचा राग निवळून ह्या अजाण अर्भकास, आपल्या नातीस शेवंताची आई मोठी करेल ही वेडी आशा त्याच्या मनात निर्माण झाली. त्याचे स्वतःचे असे कोणीच नसल्यामुळे त्याच्यापुढे दूसरा पर्याय नव्हता. शेवंताने घातलेल्या शपथेचे स्मरण त्याला झाले. आता शेवंताच नव्हती तर शपथ काय कामाची? निगरगट्ट होऊन, मनावर धोंड ठेवून मुलीच्या भविष्यासाठी तो कितीतरी मोठ्या आशेने शेवंताच्या माहेरी गेला. तिथे तर त्याला कोणी भीक घातले नाही, उलट अक्षरशः हाकलून लावले त्याला.

हातात घेतलेली बांधकामे त्याला वेळेत पूर्ण कराची होती. मुलीच्या लालनपालनाचा कितीतरी मोठा पेच त्याच्यासमोर होता. माती चालत नव्हती. ईश्वरावर हवाला ठेवण्याशिवाय तो तरी दुसरे काय करू शकत होता? शेवटी ईश्वरच त्याच्या मदतीला धावून आला. शेवंताची एक बाल मैत्रीण त्याच्या मुलीचा सांभाळ करण्यासाठी तयार झाली. तिचा पतीही भला माणूस होता. त्याने कोठलीही हरकत दर्शविली नाही. महिना दीड हजाराच्या बोलीवर ती त्याला दिवसाभर सांभाळणार होती. दिवसभराचे कामकाज आटोपून सांयकाळ नंतर तो जातीने आपल्या मुलीवर लक्ष ठेवणार होता.आई नसली तरी दाई मिळाल्याने तो बराचसा सुखावला होता.

आता तो रिक्षातून आपल्या मुलीला पावसाची तमा न बाळगता शेवंताच्या बाल मैत्रिणीकडे घेऊन चालला होता. रिक्षात बसलेल्या त्या शाळा मास्तरणीला त्याची बरीचशी कीव आली असावी. प्रथम तिने त्याला दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला. तदनंतर कुठल्याशा एका अनाथाश्रमात ते मूल दान देण्यास संगितले. तिच्या या दोन्ही पर्यायांना त्याने नम्रपणे नकार दिला. दुसरे लग्न करून त्याला त्या नाजुक जिवास सावत्र आईच्या हातात द्यायचे नव्हते. त्यासाठी तो स्वतःच्या आयुष्याची भाकर करपवण्यास

तयार होता. मात्र स्वत:च्या मुलीच्या आयुष्याला त्याला एकही चटका लागू द्यायचा नव्हता. आजच्या संगणक उगात वृद्धाश्रमाचे, अनाथाश्रमाचे प्रस्थ फोफावले असताना, जन्मदात्या आईबापास म्हातारपणी वृद्धाश्रमात ठेवले जाते. मुलांना जन्म देऊन त्यांचे पालनपोषण न करता त्यांना वाऱ्यावर सोडून जाणाऱ्या आईबापांची ह्या जगात कमी नाही मात्र अश्या लंगड्या सबबी पुढे करून त्याला आपल्या जबाबदारीपासून दूर पळायचे नव्हते. तो एक आदर्श प्रापंचिक जीवन जगू पाहत होता. तो त्या अजाण मुलीत आपल्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या शेवंताला पाहत होता. ही अजाण , मेल्या आईची पोर आपल्या लाडक्या शेवंताची एकमेव खून आहे हे तो जाणून होता. ह्या मुललीच्या अस्तित्वावर, स्वातंत्र्यावर कुढल्याही प्रकारची बाधा तो आणू इच्छित नव्हता म्हणूनच हाताचा पाळणा करून तो आपल्या मुलीस झुलवणार होता. आईची माया नसली तरी बापाच्या प्रेमाचा उबारा देऊन तो ह्या गोंडस जीवाला सुखावणार होता. स्वत: आई होऊन आपल्या मुलीचे अवघे भाव विश्व फुलविणार होता. घर बांधताना, भिंतींना आकार देता-देता आपल्या त्या 'मेल्या आईच्या पोरीच्या' भविष्याला आकार देण्याचा प्रयत्न करणार होता. परिस्थितीला शरण न जाता आत्मविश्वासाने, निर्धाराने तो आपल्यावरील जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणार होता.

साहेब, हायवे आला, उतरताय ना रिक्षावाल्याच्या बोलण्याने माझी तंद्री भंग पावली. आपापले पैसे देऊन बाकी उतारू मार्गस्थ झाले होते. त्याच्या हातातील त्या गोंडस, मुग्ध बालिकेच्या गालाला एसपीआरएसएच करताच त्याने माझ्यावर पाहून स्मित केले व तोही मार्गस्थ झाला. माझी नजर वर आभाळकडे गेली. आकाश चांगलेच उघडले होते. मोकळा धवल प्रकाश अवनीवर उतरला होता. हा प्रकाश त्या बालिकेच्या जीवनाला घडविण्यासाठी अवतरला असेल का?

**ख्रिस्तवासी मिल्टन दोडती**

**(ख्रि. मिल्टन दोडती हे एक उभरते साहित्यिक होते. युवदर्शनचे द्वैमासिक त्यांनी त्या काळात एक हाती चालवले होते. त्यांची ही कथा होली क्रॉस चर्चच्या 2000 सालच्या निर्मल या वार्षिक अंकात प्रकाशित झाली होती. ६ ऑगस्ट २००५ ह्या दिवशी एका जीवघेण्या आजाराने त्यांची ईहलोकीची यात्रा संपवली. तरुण, उमदा कवि-लेखक अकाली निघून गेला. त्यांना ख्रिस्तायन तर्फे श्रद्धांजली)**

# पाल्य संस्कार

मंडळी आज मला एका serious विषयाबद्दल थोडा बोल्यासा हाय... वासा आन विसार करा.

मॅं आन माई फॅमिली ८ वहरे आम्ही पुण्याला काढले. त्यानंतर 2 वहरे बोरीवलीला रेले आन यंदा मे महिन्यामीने आमे आपल्या वसईला घरा ज्यादो आले. त्या निमित्ताने पोरायो शाळा बदलल्यो आन पुणे, मुंबई आन आते आपल्या अडश्यो शाळा याय वेगवेगळे अनुभव आमाला घ्या मिळाले.

मॅं जीगाळा आपल्या अडे वेगवेगळ्या शाळीमिने मा पोरानकरता admission घ्या करतान visit कऱ्यासो तिगाळा काहिक गोष्टी मॅं observe केल्यो... मॅं जीगाळा शाळीत होतो तिगाळा आमाला English हिकव्यादो शिलू सर (कोरीया सर) होतो... खरा मंजे मा हारखे खूप students सा जा कय English थोडा फार सुधारला ता सर मुळे.. आन आमश्या आन आमश्या नंतरश्या batches शे पोरे अजूनही आपल्या शाळीश्या teachers ना respect देवोन हात. रस्त्यात कडेही आमशे शिक्षक भेटले ते आमे त्यायी आन ते आमशी विचारपूस करत्यात.

तर मुद्दो अहो.. आमसो respectful सर जीगाळा शाळीच्या 10th श्या पोराव class घेवोन बायर आलो आन जीगाळा मला बगीला तिगाळा आमे एकमेकांना wish केला आन बोल्या लागले. तीगाळा शाळीशे काहिक पोरे बायर येताना सरशी टिंगल करोन जोरजोरात हावले... मला जाम वाईट वाटला... तुमश्या गुरुजणांना जर तुमाला respect देता येत नाहेदे ते तुमसा शिक्षण सगळा फुकाट हाय.

नंतर माये पोरे आपल्याअडे शाळीत जा लागले... त्यांना अडे आल्यानंतर त्यायी आमश्या हरी अड्श्या शाळीशे जे कय अनुभव हांगिले ते ऐकोन खरा मंजे मला ई post अडे लीव्या वाटली... std. 6th पासून std. 10th पर्यंत आपल्या शाळी मीने का सलाते जरा पालक आन youngsters यायी लक्ष द्या...

- 7th पासून आपल्या अडे काहिक पोरांना girlfriend / boyfriend हात.

• शाळीश्या teachers ना पोरे अजिबात respect देत नात .

• शाळीश्या teachers ना पोरायी टोपण नावे ठविल्यात (Nick name) आन teachers हिकवित असताना उनाड पोरे teachers सा लक्ष्य नसताना जोरामिने त्या नावाने शीडवित्यात.

• आपल्या शाळीशे पोरे (त्यात पोरयोसुद्धा) घरा video/ internet/ pc वरती BP (Blue Film) बगीत्यात. आन त्या परिणाम sexual relationship पर्यंत पण काहिक जनायी मजल गेले. आन एकदा गा तुमाला कोवळ्या वयामीने ती चटक लागली गा पुडसा Career, शिक्षण याये बारा वाजले मनून समजा.

• पोरान दरी भारी भारी मोबाईलशे handset..(`10 to 20 K पर्यंत) हात.

• 8th पासुनुस पोर हाता Bike ,Scooty, Activa येते .

• 7th पासून काहिक पोराव वेळ यो boyfriend ना ते girlfriend आन class मीने जोड्यो जमविन्या मीने जाते.

वरशे statements General हात… पण पोराबाबतीत टक्केवारी खूप जास्ती हाय Girls श्या बाबतीत ती कमी हाय पण एक नाहको आंबो इतर आंब्यांना नाहविते त्यामुळे टक्केवारी कमी जरी हहली तरी पुढश्या 10 वाहारामीने ती कडे जायदे ता हांगता ये नाय.

आपल्याला वाटाते आपल्या पोरांना 90% marks मिळात्यात मंजे पोरे जाम हुशार… आजकालसा शाळीतसा शिक्षण मंजे एक सौदो जाले …ओडा लिवा आन ओडे marks काडा.. tutions पेपर होडविले गा जाला… त्यामुळे खरा मंजे सामाजिक मूल्य, संस्कार यो गोष्टी बाजुलास रेल्यात. Best of 5 मुळे 95% ला पण वर्तक कॉलेज ला science ला admission मिळणं मुश्कील होते . आपुन catholic हात त्यामुळे आपल्या पोरांना CET मीने 60 (मंजे 30%) score जरी मिळालो तरी St. Francis, St. Xaviers, Don Bosco आन St. John ह्या हारक्या कॉलेज मीने Enginnering ला admission मिळाते आन ते Engineer होत्यात.. ना ते ओड्या score ला बायर तुमाला कून कुत्रा पण विसरी नाय … आपले पोरे IIT, IIM, ना ते public services मीने का नाय जावू शकात?…

जरा मुद्दो बाजूला पडलो… मॅ याये मा परिन कारणे शोद्यासो प्रयत्न केलो….

आमे जीगाळा शाळीत जातोते.. किंवा 2000 सालापर्यंत जे SSC झाले त्यांना त्याये parents हांग्याशे… घरा ना ते गावामीने जर कई मस्ती केली ते शाळीमीने teacher ला नाव हांगीने. Teacher सो धाक वाट्यासो.. Respect मनून... घाबरो मनून नाय. parents शाळीमीने हांग्याशे आमशे पोरे मस्ती करत्यात हायदे ते बेलाशक फोडोन काडा… गावामीने १-२ माहणे हायाशे(Senior citizen) कि ज्यांना आख्या गावाशे पोरे घाबरयाशे.. आमश्या गावामीने सातुकाका मनून होतो.. स्वत: कयिस हिकलोनोतो पण आख्या गावाशे पोरे त्याला respectful घाबरयाशे… "पोरा तू अमुक कई करता गा.. थांब तुआ दादयला नाते, बाबाला नाव हांगाते". त्याला गावश्या पोराव कान पिळ्यासो अधिकार होतो… आज काल का सल्ले?.. शाळीमीने पोरायो बयो (Sorry मम्म्यो)..Teacher श्या हरी मारो कऱ्यादो तयार. आमश्या पोराला कादो मारला मनून... गावामीने जर कून पोर मस्ती करते हायदे आन त्याला जर आपुन टपराकिला ते त्या बय-बाबा तुमश्या हरी मारो कऱ्या हजर… तिगाळा आमे कुणा हरी जर मारो केलो आन घरा कळाला गा त्यावरती बी २ रपाटे पड्याशे आन हांग्याशे तुला कुणे मारो कऱ्या हांगीलतो.. ना ते तूस कई तरी केले हायदे मनून मार खालो… आन आते?… "तुला कुणे मारला रे?". मंजे माव बाबू, बाबी कुणा अद्यात मध्यात नाय. आन इतर जनाई पोरे त्या बिचाऱ्यावर अन्याय करत्यात… पोरांना अहीस हवय लागाते...

आजकालश्या पोरांना माहित हाय आपल्या बय-बाबा दरी कोडो पैसो हाय तो.. त्यांना पैश्या कई values नाय.. पोराने मांगीला गा पोरांना दिला.. Mummy-Daddy दोगे कामोर जात्यात आन पोरे आपले हात घरा 24 तास टि.व्ही , इंटरनेट, मोबाईल… तुमश्या घरने तुमशे बय बाबा (आजी/आजोबा) तुमशे पोरे 5th ला गेले गा तुमाला पा नाय.. मंग पोरोरती लक्ष कुणे दयासा.. कोवळा वय आन हातामीने जगातशी सगळी माहिती हाहलेली सगळी यंत्रणा बटन दाबिता बरोबर हजर.. तुमाला माहिती हायदेस 7th पासूनशे आपले पोरे Facebook वर हात.. parents ना वाटाते पोरे रातशे खोलीमीने अभ्यास करत्यात. आज तुमे Facebook login करा रातशे ११/१२/०१ वाजेपर्यंत आपले ५०/१०० पोरे तुमाला online दिखेद्यात. आन मंग कून मार, भंगी, तेली, भैया, मद्राशी… कून पण अहो.. त्याहारी दोस्ती... कुपाऱ्यायो पोऱ्यो इतर जनाहरी कय पळोन जात्यात… तर त्याय सुरवात ई अही होते. बय-बाबा दरी पोरांकरता टाइम नाय… पैसो हाय…पोर / पोरी हांगाते Daddy मला 90% मिळालेते ते Cycle, Scooty, Activa, Hunk, Ipod, Apple, Blackberry, Laptop

घेवोन दे. कोडे parent आपल्या पोरांना books घेवोन देत्यात गा newspaper वाश्या लावित्यात? आन आपले parent मला नाय मिळाला.. मा एकुस पोर हाय एकुस पोरी हाय. मॅ कमाविते ता त्या करतानुस, मा एकुस पोर हाय त्याला कुणे कय बोयला पा नाय… आपल्या समाजामीने आजकालश्या लोकांना पैश्याव जाम माज आले.

गाडी सालव्या दो, adult movie बग्यादो, Beer प्यादो minimum age bar का हाय…18 years… कय? त्या age ला थोडी फार maturity येते. 12 years किंवा Teenage मीने यो सगळ्यो गोष्टी आपल्या पोरा हातामीने easily available हात… आपली पिढी वाह्वत सालली… ई पिढी हीकेदे, पैसो कमाविदे, affairs करदे पण त्यांना त्या teachers, principal, आन आपल्या घरशे, गावाशे बुजुर्ग माह्णे यांना respect कोहो द्यासो ई जर नाय हिकविला तर मॅ तुमाला हांगाते , 200% ये पोरे तुमश्या कडीवर लाथ मरोन तुमाला पुढे विसारणार नाय…

मॅ परत एकदा हांगाते… मॅ पुणे, मुंबईला रेलो आन आख्या भारतभर फिरलो पण मॅ आहा कडे बगीला नाय. पण आपल्या वसई मीने सगळ्यास शाळीमीने थोड्या फार प्रमाणामीने यो जो प्रकार सालू झाले त्यावर सुजाण parents आन youngsters याई प्रबोधन करोन आपल्या येणाऱ्या पुढश्या पिढीला एक respectful नागरिक बनव्यासो प्रयत्न केलो पाय..

वरती जा कय मी लीविला ता मनापासून , पोट तिडकीने लीविले.. आज माये पोरे त्या situation मीने जा लागल्यात.. त्या करता मला जा वाटला ता मॅ अडे लीविला… कुणाला अडे दुखव्यासो अजिबात हेतू नाय.

## श्री. सायमन फिलिप रॉड्रिग्ज, आगाशी, क्रॉस नाका

**(श्री. सायमन रॉड्रिग्ज हे टेक्साइल इंजिनियर आहेत, पुणे येथे ८ वर्षे टेक्साइल मशीनरी व मार्केटिंग क्षेत्रात काम केले आहे, सध्या इंपोर्ट- एक्सपोर्टचा बिझनेस करत आहेत, वाचन व संगीत यात विशेष रुची आहे.)**

# जबाबदार

फोनची रिंग वाजली, समीरने रिसिव्हर उचलला,,. तो ऐकत असताना त्याच्या अंगाला दरदरून घाम फुटला. दाणकन सोफ्यात कोसळला तो. ती बातमी होती ' त्याचा जीवश्च-कंठश्च मित्र साहिलने गळफास लावून आत्महत्या केली होती.

कालच ते सारे कॉलेजचे मित्रमैत्रिणी महाबळेश्वरला सहलीला जाऊन आले होते. साहिलही होता. आल्यानंतर रात्रही सरली नव्हती आणि साहिल अनंतात विलीन झाला होता. असे काय अचानक घडले की ज्यामुळे साहिलने हे जग सोडून जाण्याचा मार्ग पत्करला?

साहिलच्या अंत्ययात्रेला जाऊन आल्यापासुन समीरचे चित्त ठिकाणावर नव्हते. तो वारंवार एकच विचार करत होता, साहिल असा भरल्या ताटावरून का उठून गेला? विचारांचे थैमान डोक्यात उठले असतानाच भूतकाळ त्याच्या डोळ्यापुढून सरकू लागला......

दहावीचा निकाल लागला होता आणि जूनियर कॉलेजच्या अॅडमिशनसाठी कॉलेजला एकच  झुंबड उडाली होती. सायन्स शाखेच्या रांगेत समीर उभा होता. त्याच्याच मागे साहिल उभा होता. अॅडमिशन फॉर्मविषयी एकमेकांची चौकशी करत असताना दोघांची ओळख झाली. मध्यंतरी काही मुले साहिलच्या समोर रांगेत घुसली. साहिलने त्यांना मज्जाव केला तेव्हा त्या मुलांनी साहिलला ढकलून रांगेतून बाहेर काढले. समीर हे सर्व पाहत होता, त्याने साहिलला आपल्या स्वत:पुढे रांगेत उभे केले.

दोघांनाही नंतर एकाच वर्गात प्रवेश मिळाला आणि दोघांची गाढ मैत्री झाली. दोघेही एकाच बाकावर बसत तसेच एकत्र हिंडत फिरत. बुजऱ्या स्वभावाच्या साहिलला समीरचा फार मोठा आधार मिळाला. एकमेकांशिवाय आता त्यांचे पानही हलत नव्हते.

यथावकाश दोघेही सीनियर कॉलेजला गेले. येथे त्या दोघांच्या परस्पर विरोधी स्वभाव गुणांची प्रचिती येत होती. साहिल लाजाळू, भोळाभाबडा, मितभाषी आणि आपण व आपले काम अश्या  स्वभावाचा होता तर समीर उश्रुंखल आणि चंचल स्वभावाचा होता. साहिल मुलींकडे ढुंकूनही पाहत नसे तर समीर छेड काढण्यात वाकबगार होता त्याचा बहुतांश वेळ हा मुलीच्या मागे जात असे. संपूर्ण दिवस कॉलेजमध्ये तो आणि इतर काही

टारगट मुले ह्यांचा धिंगाणा चालू असे आणि साहिल ह्या वेळात लेक्चरला नाहीतर लायब्ररीत वाचत बसलेला असे. असे परस्पर विरोधी स्वभाव असूनसुद्धा दोघांच्या मैत्रीवर काडीमात्र फरक पडला नव्हता.

यंदा ते कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होते. जोरदार तयारी करून विशेष प्रावीण्य मिळवण्याचे ध्येय त्यांनी योजले होते. या वर्षी त्यांच्या वर्गात दोन-तीन नवीन अडमिशन झाली होती. त्यापैकीच एक होती, सीमा. सुंदर व सुस्वभावी सीमा प्रॅक्टिकलसाठी साहिलची पार्टनर होती. शांत व मनमिळावू सीमाशी साहिल मोकळेपणाने बोलत असे. तसा इतर मुलींशी फारसे न बोलणाऱ्या साहिलला सिमाने बरेच बोलते केले होते. एकदाची परीक्षा आली आणि संपली. यानंतर प्रत्येकजण आपापल्या वेगवेगळ्या मार्गानी जाणार होता. त्यामुळे कोणीतरी शक्कल लढविली आणि सर्वजण महाबळेश्वरचा सहलीला जाण्याचा बेत आखण्यात आला.

परीक्षा संपल्यामुळे प्रत्येकजण निवांत झाला होता. साहिल आपल्या भवितव्याविषयी विचार करत होता. चांगला जॉब शोधून आयुष्यामध्ये काहीतरी करून दाखवण्याचा त्याने निश्चय केला होता. सीमाही असाच विचार करत होती, तिचे पप्पा वर्षभरात निवृत होणार होते. त्यामुळे त्यांनी तिला लग्नासाठी स्थळे शोधायला सुरुवात केली होती. पण सीमाचे मन यासाठी तयार नव्हते, तिला कळून चुकले होते की तिच्या मनाने वर शोधला होता, ती साहिलच्या प्रेमात पडली होती. भोळाभाबडा साहिल तिच्या मनात घर करून राहिला होता. साहिल आपला साधा भोळा, त्याला याची तसूभरही कल्पना नव्हती. समीरही त्याच्या वडिलांच्या इंपोर्ट-एक्सपोर्टच्या बिझनेसमध्ये सामील होणार होता. त्याला एका गोष्टीने बेचैन केले होते, तो सीमाच्या प्रेमात पडला होता. साहिलला सांगून तिच्याकडे शब्द टाकायला सांगितले होते, सहलीदरम्यान साहिल सीमाकडे यासंबधी बोलणार होता. सीमानेही साहिलकडे आपले मन उघड करायचे ठरवले होते.

ते सगळे महाबळेश्वरला पोहोचले. तीन दिवस भरपूर फिरून प्रवासाचा शीण असल्यामुळे सर्वजण अगोदरच बुक केलेल्या आपापल्या रूममध्ये जाऊन आराम करू लागले होते.दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेलमधून चेक आऊट करून फिरत फिरत ते संध्याकाळ पर्यंत घरी परतणार होते. समीर आणि त्याच्या काही मित्रांनी ओली पार्टी करण्याचा घाट घातला होता. साहिलला हे पसंत नव्हते म्हणून तो होटलच्या बाहेर

पार्कमध्ये जाऊन बसला होता. त्यांच्या सर्वांचा एकत्र शेवटचा सहवास होता. त्यामुळे विचार करून सीमा साहिलला शोधत त्यांच्या रूमवर आली.

साहिल रूमवर नव्हता आणि समीर व त्याची गँग प्यायला बसली होती. तीन-चार पेग रिचवल्यामुळे सगळ्यांनाच झिंग आली होती. तिने साहिल कुठे आहे असे विचारले, तो आतमधल्या रूममध्ये झिंगून पडल्याचे त्यांनी तिला संगितले. एवढ्यात समीर उठला व सीमापाशी आला व तिचा विनयभंग करू लागला. तिने प्रतिकार करताच त्याने तिच्या अंगावर दारूचा ग्लास सांडला. ती ताबडतोब तिथून निघाली. तिचे मन दुखावले होते, साहिल सारखा माणूस झिंगून पडल्याचे तिला सहन होत नव्हते तसेच तिचा विनयभंग झाला होता.

दुसऱ्या दिवशी घरी निघेपर्यंत ती चूप होती, कोणाशीही एक शब्द ती बोलली नाही. बसमधून उतरत असताना तिने एक सीलबंद चिठ्ठी साहिलच्या हाती दिली. सर्वजण आपापल्या घरी परतले. झोपायला जाण्यापूर्वी साहिलने सीमाची चिठ्ठी वाचायला घेतली. वाचता वाचता त्याला भोवळ आल्यासारखे झाले. सीमाने त्याच्यावर भयंकर आरोप केले होते, त्याला बेवडा, लंपट म्हटले होते. आतापर्यंत साधे चहाचेही व्यसन नसलेल्या आणि मुलींच्या बाजूलाही न फिरकणाऱ्या साहिलला हे आरोप म्हणजे आघात होते तसेच सिमाने या पत्रात तिच्या प्रेमाची कबुली दिली होती आणि यापुढे आयुष्यभर त्याचे तोंड न पाहण्याची शपथ घेतली होती. हा आघात त्याला जीवघेणा वाटला आणि त्याचवेळी त्याच्या डोक्यात विचित्र सणक आली, या निर्लज्ज जगाचा त्याला वीट आला. आणि थोड्याच वेळात त्याचा देह पंख्याला लटकला.

साहिलच्या अंत्ययात्रेला जाऊन आल्यापासुन समीर त्याच्या घरी गेला नव्हता. त्याला पाहताच साहिलच्या आईच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या, ती त्याला घेऊन साहिलच्या खोलीत आली. याच खोलीत त्यांनी एकत्र अभ्यास केला होता. टेबलापाशी सहजगत्या उभा असताना त्याने एक पुस्तक उचलले, ते समिरणे त्याला गिफ्ट दिले होते, ते चाळत असताना त्याला ते पत्र दिसले. आपण नशेत काय मोठी चूक करून बसलो आहोत याची त्याला कल्पना आली. मैत्री अतूट राहण्यासाठी त्याने आपले बलिदान दिले होते. सारे रहस्य गुलदस्त्यातच राहिले होते, आपला परम प्रिय मित्राच्या आत्महत्येला तोच जबाबदार होता......**श्री. ख्रिस्तोफर रिबेलो**

# साक्रामेंत की सोहळा महत्वाचा ?

ख्रिस्ती धर्म प्रभू येशूच्या जन्म, दु:ख, मरण आणि पुनरुत्थीत सोहळ्याचा धर्म आहे. आपला तारणारा आपणासमवेत सदोदित आहे ह्या आशेने जगण्याचा धर्म आहे. “प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता, शब्द देव होता." तो आम्हामध्ये राहिला )योहान 1:1). प्रभू येशू ख्रिस्ताने मानव म्हणून जीवन जगताना सात साक्रामेंतांची स्थापना केली . आपण ख्रिस्ती ह्याच सात साक्रामेंताच्या संस्काराद्वारेम्हणून घडविले जातो. पवित्र गुरुवारी धर्मगुरू पदाची स्थापना करून त्या साक्रमेंतला दैवी आशीर्वादाचा व कृपेचा झरा बनवले स्माबाप्ति .साक्रमेंताद्वारे आपण ख्रिस्ताच्या स्वर्गराज्याचे वारस बनतो पापनिवेदन . व ख्रिस्तशरीर स्वीकारल्यामुळे आपण ख्रिस्तमय होतो मी" .नाही तर ख्रिस्त माझ्याठायी जगत आहे" या उक्तीचा अनुभव येऊ लागतो .ह्या श्रद्धेच्या प्रक्रियेत परिपक्व होत असताना दृढीकरण साक्रामेंताने आपण ख्रिस्ताच्या संदेशाचे त्याच्या प्रेषित कार्याचे वाहक बनतो.

लग्न साक्रामेंत हा महत्वाचा संस्कार आहे. जेथे सज्ञान, शहाणे व वयात आलेले स्त्री पुरुष शरीर-व मनाने विवाहाद्वारे एक होतात उत्पत्तीच्या पुस्तकात परमेश्वराने . ते दोघे "एकदेह होतीलउ)"त्पत्ती(2:24 असा आशीर्वाद दिला आहे. परमेश्वराची ही कृपा, भाविकांचे आशीर्वाद विवाहितांना आयुष्यभर एकत्र साथसंगत देण्यास पुरेशी आहे. परंतु या कृपेचा, आशीर्वादाचा झरा अखंड चालू ठेवण्यास त्यांनी एकमेकांना समजून घ्यावे, गुणदोषांसह एकमेकांचा स्विकार करायला हवा आपण वेगळे नसून .एकदेह आहोत याची प्रचिती एकमेकांना करून देणे अत्यंत गरजेचे असते. लग्न साक्रामेंत हे कौटुंबिक स्थापनेचा, पर्यावरण संतुलनाचा महत्वाचा घटक आहे. म्हणूनच लग्नाअगोदर सोयरिक करण्याची पद्धत आहे.सोयरिक म्हणजे लग्न नव्हे, तर विवाहाअगोदर दोन कुटुंबाच्या भेटीगाठीतून, ओळखीतून देव किती प्रेमळ, समंजस, करुणामय, क्षमाशील आहे ह्याची साठवण करून त्याचा एकदिवस लग्न सोहळ्यात रुपांतर करण्याचा काळ आहे. साथ-सोबत, सहवास सुसंवाद यातून भावी जीवनाचे रंग भरण्याचा हा काळ असतो. सोयरिक अशासाठी की या मैत्रीला आई-वडिलांचा आशीर्वाद आहे हे समाजाला समजावे इतकेच.

पूर्वी सोयरिक करण्यासाठी आपल्या समाजात "चार माणसे" बोलवण्याची रीत होती. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता मुलाच्या कुटुंबातील चार माणसे मुलीकडे

तर मुलीच्या कुटुंबातील चार माणसे मुलाकडे जात असत .त्या विधीला "माणसे बोलावली होती" असे म्हणत स्वकीयामध्ये मिठाई वाटून ,नंतर आप्त .हा आनंद साजरा होत असे.पण आता "चार माणसांची "'चारशे माणसे कधी झाली ते कळलेच नाही. मंडप, लायटिंग, डी जे मूझ्यिक, ३००-४०० लोकांना आमंत्रण, केटरिंगची प्लेट वारी जेवणे, सोन्याच्या दागिन्यांची देवाणघेवाण-, दारूचा खुला बार नवोदित मद्यपी तरुणांचा)मद्य प्राषणाचा दिक्षाविधी (हे सर्व पाहिले की वाटते, आपला समाज खरच सुसंस्कृत बनला आहे का?

आपण ह्या स्पर्धेच्या जगात असताना जीवघेणा प्रवास करून किंवा व्यवसायात फार मोठा धोका पत्करून दोन पैसे कमावतो म्हणून आपल्या पैशाला घामाचा सुगंध येतो. अश्या ह्या श्रमाचे पैसे आपण अनावश्यक भोजनावळीस खर्च करावे का? प्रत्येकाने आत्मपरीक्षण करायला हवे .फर्स्ट कम्युनियन, सोयरिक ह्यासाठी मोठ्या सोहळ्याच्या दृष्टचक्रात अडकून पडू नका .ही बाब समाजाच्या हिताची नाही असे मला वाटते.

वास्तविक आपल्या जीवा -भावाची चारच माणसे असतात. आजारात, अडीअडचणीत आपल्या सोबत रात्र कोण काढतो? कुटुंबातील माणसेच ना? रक्ताच्या नात्याच्या एका धाग्यात गुंफलेले आपले आप्तजन हेच हॉस्पिटलमध्ये, संकटसमयी आपल्या सोबत असतात ना? शेवटी मरणाच्या वेळी पेटी धरायला कोणाची व किती माणसांची गरज लागते? चार कि चारशे ? हीच चार माणसे कुटुंबातील, नात्यातील असतात ना?

सोयरिक झाल्यावर वाग्दत्त वधूवरामध्ये मतभेद झाल्यास सोयरिक सोडण्याची मुभा असते. त्यासाठी कोणाची हरकतही नसते .परंतु " चार" चे झाल्यामुळे "चारशे"जर का दोघांपैकी एका व्यक्तीला सोयरिक मोडायची असल्यास सामाजिक दडपण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अवाढव्य खर्च करून शेकडो लोकांच्या साक्षीने केलेली सोयरिक कशी काय सोडायची? शेवटच्या क्षणापर्यंत सोयरिक सोडण्यास स्वातंत्र्य असताना केवळ सामाजिक दडपणामुळे जर लग्नविधी पार पडला तर त्या नव कुटुंबाचे भविष्य काय असेल? लग्न साक्रामेंताद्वारे दोन शरीरापेक्षा दोन मने एक होणे हे महत्वाचे आहे. तेच खरे पावित्र्य आहे. म्हणूनच तरुणांचे निर्णय स्वातंत्र्य हिरावून घेणारा सामाजिक भोजन

समारंभ कुटुंबापुरता मर्यादित असावा. यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा अन्यथा भावी पिढी आपल्याला कधीच क्षमा करणार नाही.

फर्स्ट कम्युनियन आणि लग्न ह्या दोन पवित्र साक्रामेंताचे सोहळे मोठ्या प्रमाणात साजरे होत आहेत. प्रथम ख्रिस्तशरीर साक्रामेंताद्वारे निरागस, निष्पाप बालकांच्या हृदयात प्रभू येशू येत असतो ह्या मुलांचे प्रभू येशू बरोबर घनिष्ट नाते जुळते. किती पवित्र विधी हा ! जीवनभर जपण्यासारखा तसेच लग्न साक्रमेंताद्वारे देवाच्या साक्षीने दोन जीव एकत्र येतात. एकमेकांशी आमरण एकनिष्ठ राहण्याचे वचन देतात. एकदिवशी, एकावेळी ती दोघे ख्रिस्तशरीर व विवाह ही दोन साक्रामेंत स्वीकारतात. या दोन्ही विधीचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे. या दोन विधीनिमित्ताने चार पाहुणे बोलावण्याची प्रथा समाजात रूढ झाली आहे. पूर्वी फक्त लग्नच साजरे होत असे, आता समाजाची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे "कारण शोधा, वारण करा" ही प्रवृत्ती वाढीस लागत आहे. परंतु प्रत्येक कार्यक्रमाला मद्याची जोड असलीच पाहिजे का?, मद्यपान हा व्यक्तीचा खाजगी प्रश्न आहे, त्याला आता सामाजिक प्रतिष्ठा मिळत आहे, ही चिंतेची बाब आहे.

**रे. फा. ज्यो डिमेलो.**

**(फा ज्यो डिमेलो हे पवित्र त्रैक्य .चर्च, गोम्स आळी परिसरचे प्रमुख धर्मगुरू आहेत(.**

# ख्रिसमस विशेष :

**<u>शब्द देह झाला</u> (योहान १:१-५,१४,१६)**

१प्रारंभी शब्द होता, शब्द देवाबरोबर होता, आणि शब्द देव होता. २तोच प्रारंभी देवाबरोबर होता.
३त्याच्या द्वारे सर्व झाले; आणि झाले असे काहीदेखील त्याच्याशिवाय झाले नाही.
४त्याच्या ठायी जीवन होते; आणि ते जीवन मनुष्यांचा प्रकाश होते.
५तो प्रकाश अंधारात प्रकाशतो; पण अंधाराने त्याला ग्रासले नाही.
१४आणि शब्द देही झाला व त्याने आमच्यात वसती केली; तो कृपा व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता.
आम्ही त्याचे गौरव, ते पित्याच्या एकुलत्याचे असे गौरव आम्ही पाहिले.
१६आपल्या सर्वांना त्याच्या पूर्णतेतून कृपेवर कृपा प्राप्त झाली.

**<u>मरियेचे स्तोत्र</u>**

४६आणि मरिया म्हणाली, माझा जीव प्रभूला थोर मानतो,
४७आणि माझा आत्मा माझ्या तारक देवामुळं उल्लासला आहे.
४८कारण त्यानं आपल्या दासीच्या दैन्यावस्थेकडे पाहिलं आहे, कारण पहा, आतापासून सर्व पिढ्या मला धन्य म्हणतील.
४९कारण, जो समर्थ आहे त्यानं माझ्यासाठी मोठ्या गोष्टी केल्यात. त्याचं नाव पवित्र आहे.
५०आणि त्याला भिणाऱ्यांवर त्याची दया पिढ्यान् पिढ्या असते.
५१त्यानं आपल्या बाहूनं आपलं बळ दाखवलं आहे. गर्विष्ठांना त्यांच्या मनांतल्या कल्पनेनं पांगवलं आहे.
५२अधिपतींना आसनांवरून उतरवलं आहे. आणि दीन अवस्थेत असलेल्यांना वर उचललं आहे.
५३त्यानं भुकेल्यांना उत्तम पदार्थांनी तृप्त केलं आहे. आणि सधन असलेल्यांना रिकामं पाठवून दिलं आहे.
५४-५५त्यानं आपल्या पूर्वजांना म्हटल्याप्रमाणं अब्राहामावरील आणि त्याच्या संतानावरील सर्वकाळची दया स्मरून आपला सेवक इस्राएल ह्याला साहाय्य केलं आहे.

**<u>मरिया अलिशिबेला भेटते (लूक १४५-३५:)</u>**

३५तेव्हा देवदूत तिला उत्तर देऊन म्हणाला, ‘पवित्र आत्मा तुझ्यावर उतरेल, आणि परात्पराची शक्ती तुझ्यावर छाया करील. आणि म्हणून ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र देवाचा पुत्र म्हणतील.
३६आणि बघ, तुझी नातलग जी अलिशिबा तिलाही तिच्या म्हातारपणी मुलाचा गर्भ राहिला आहे. आणि जिला वांझ म्हटलं जाई तिला हा सहावा महिना आहे.
३७कारण देवाचं कोणतंही वचन अशक्य होईल असं होणार नाही.
३८आणि मरिया म्हणाली, ‘बघा, मी प्रभूची दासी, मला आपल्या वचनानुसार होवो.’
मग देवदूत तिला सोडून गेला.
३९आणि त्या दिवसांत मरिया निघाली, आणि घाईने, यहुदाच्या डोंगराळ प्रदेशात एका नगरात आली,
४०आणि जखर्याच्या घरात जाऊन, तिने अलिशिबेला अभिवादन केले.
४१आणि असे झाले की, अलिशिबेने मरियेचे अभिवादन ऐकले तेव्हा बाळाने तिच्या उदरात उडी मारली; आणि अलिशिबा पवित्र आत्म्याने भरून
४२मोठ्या आवाजात ओरडून म्हणाली, ‘स्त्रियांत तू धन्य! आणि तुझ्या पोटचं फळ धन्य!
४३आणि माझ्या प्रभूच्या आईनं माझ्याकडे यावं हे मला कुठून?
४४कारण बघ, माझ्या कानी तुझ्या अभिवादनाचा आवाज आला, तेव्हा बाळानं माझ्या उदरात हर्षानं उडी मारली.
४५जिनं विश्वास ठेवला ती धन्य, कारण तिला प्रभूकडून जे सांगण्यात आलं त्याची पूर्णता होईल.’

## **बेथलेहेमाविषयीचे भविष्य (मत्तय २६:)**

६‘आणि तू बेथलेहेमा, यहुदाच्या प्रांता, तू यहुदाच्या सरदारांत मुळीच कनिष्ठ नाहीस, कारण तुझ्यामधून एक अधिपती येईल, आणि तो माझ्या राष्ट्राचा, इस्राएलाचा मेंढपाळ होईल.’

## **देव पुत्राद्वारे आपल्याशी बोलला (इब्री १४-१:)**

१जो देव मागील काळात, अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांद्वारे पूर्वजांशी बोलला,
२तो ह्या शेवटच्या दिवसांत, पुत्राद्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याला त्याने सर्व गोष्टींत वारीस म्हणून नेमले आहे; त्याच्या द्वारे त्याने युगे निर्माण केली.
३तो त्याच्या तेजाचे प्रतिबिब व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून, आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने सर्व काही चालवीत आहे; त्याने पापांची शुद्धी केल्यावर तो वरील वैभवाच्या उजवीकडे बसला.
४कारण त्याला वारशाने, देवदूतांहून अधिक श्रेष्ठ नाव मिळाल्यामुळे तो तितका त्यांच्याहून अधिक श्रेष्ठ केला गेला आहे.

## **देवाने आपला पुत्र दिला (योहान ३१७-१६:)**

१६कारण देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला ह्यासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सनातन जीवन मिळावे.

१७कारण देवाने पुत्राला जगात पाठवले ते जगाचा न्याय करायला नाही, पण त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले.

**<u>एक मोठा प्रकाश</u>** <u>यशया ९(जुना करार) २:</u>

अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे, मृत्युच्छायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे.

**<u>काळाची पूर्णता</u>** <u>गलती ४५-४:</u>

४पण काळाची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठविले; तो स्त्रीपासून जन्मास आला, नियमशास्त्राखाली जन्मास आला,
५ते ह्यासाठी की,नियमशास्त्राखाली असलेल्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे; म्हणजे आपल्याला पुत्र होण्याचा हक्क मिळावा.

**<u>त्याच्या राज्याचा अंत होणार नाही</u>** <u>लूक १२६:-३३</u>

२६आणि देवाकडून गब्रिएल दूताला सहाव्या२७- महिन्यात, गालिलातील नासरेथ नावाच्या एका गावी, दाविदाच्या घराण्यातील योसेफ नावाच्या एका मनुष्याला वाग्दत्त असलेल्या एका कुमारिकेकडे पाठविण्यात आले.
२८आणि देवदूत तिच्याकडे आत येऊन म्हणाला, "जयजयकृपायुक्ते !, प्रभू तुझ्याबरोबर आहे."

२९पण त्याच्या बोलण्याने ती अस्वस्थ झाली व ती विचार करू लागली की, हे अभिवादन काय असेल?
३०आणि देवदूत तिला म्हणाला, "मरिये, भिऊ नको, कारण देवाची कृपा तुझ्यावर झाली आहे.
३१आणि बघ, तुझ्या पोटी गर्भ राहील, आणि तुला पुत्र होईल; आणि तू त्याचं येशू हे नाव ठेव.
३२तो महान होईल आणि त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील आणि परमेश्वर देव .त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचं राजासन देईल.

३३तो याकोबाच्या घराण्यावर युगानुयुग राज्य करील आणि त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.”

**आमच्याबरोबर देव** मत्तय १२३-२२:

२२हे सर्व ह्यासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्याकडून जे सांगितले होते ते पूर्ण व्हावेत्याने . असे म्हटले आहे की,
२३‘बघा, कुमारी गर्भवती होईल, तिला पुत्र होईल, आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील.’ ह्याचा अर्थ ‘आमच्याबरोबर देव’ असा आहे.

**प्रभूचा मार्ग तयार करा** मार्क १३-२:

२३-‘पहा, मी माझ्या निरोप्याला तुझ्या तोंडापुढे पाठवीन आणि तो तुझा मार्ग तयार करील.’ रानात ओरडणाऱ्याचा आवाजः प्रभूचा मार्ग तयार करा, त्याच्या वाटा नीट करा’,

**तो आपल्या लोकांना त्यांच्या पापांपासून तारील** मत्तय १२०:-२१

२०आणि तो ह्या गोष्टीवर विचार करीत असता, बघा,परमेश्वराचा दूत त्याला स्वप्नात प्रगट झाला आणि त्याला म्हणाला, “दावीदपुत्र योसेफा, तू आपली पत्नी मरिया हिला आपल्याकडे आणायला भिऊ नको, कारण तिच्या पोटी जो गर्भ राहिला आहे तो पवित्र आत्म्याकडून आहे.
२१तिला पुत्र होईल, आणि तू त्याचे येशू हे नाव ठेवकारण तो आपल्या लोकांना त्यांच्या . .पापांपासून तारील”

**मनुष्यांवर कृपा** लूक २:१३- १४

१३आणि अकस्मात्, त्या देवदूताजवळ, एक स्वर्गीय सैन्याचा समुदाय आला, आणि त्यांनी देवाचे स्तवन करीत म्हटले,
१४“ऊर्ध्वलोकी देवाला गौरव, आणि पृथ्वीवर शांती, मनुष्यांवर कृपा.”

**(नवा करार र. ह. केळकर भाषांतर)**

# हसू नका बरे!!!

लोक सभा चे कामकाज
11:00 am : entry
11:05 am : " बैठ जायीये "
11:06 am : " शोर मत माचायीये "
11:07 am : " शांत रहिये "
11:09 am : " प्लीज शांत रहिये "
11:10 am : " सब घर जयीये , House is adjourned for day"
जय हो�! भारतीय लोकशाही ची!!

माझी बालपणीची शौर्यकथा : .
मी एका सिंहाच्या कानाखाली लावली ......... .
एका वाघाच्या पेकाटात लाथ घातली ......... . .
एका चित्त्याचा तंगडा मोडला ..... . .
एका हत्तीला फेकून दिला . .
.
.
..
---
मग मात्र मला त्या खेळण्याच्या दुकानाच्या मालकाने दुकानाबाहेर काढला........

एका खेडेगावातल्या शाळेत बाईंनी मुलांना गणित करायला सांगितले "समजा एका खुराड्यात सतरा मेंढरे आहेत त्यातील पाच मेंढरे खुराड्याच्या बोळातून उद्या मारून बाहेर गेली तर खुराड्यात किती मेंढरे शिल्लक राहिली ?"'
गणपतने बेलाशकपणे सांगितले "एकही नाही " बाईंनी त्याचा कान पकडून विचारले "तुला गणित समजले कि नाही ? तसा गणपत समजावणीच्या सुरात बाईना म्हणाला " बाई ते गणितातले वेगळे असते आणि मेंढरांचे वेगळे असते.जर एक मेंढरू कुठूनही बाहेर गेले कि बाकीची मेंढरे त्याच्या मागून नक्कीच जाणार "

**प्रामाणिकपणा**
नोकर - साहेब केराच्या टोपलीत मला पाचशेच्या या पाच नोटा सापडल्या.
साहेब - मीच फेकून दिल्या त्या. नकली आहेत.

नोकर - हो, मला माहितीय म्हणून तर मी त्या तुम्हाला देतोय.

**दारूडा**

एक दारूडा रस्त्यावरून जात असतो. समोरून त्याला एक जण येताना दिसतो तेव्हा,
दारूडा - अरे माझ्यासाठी एक टॅक्सी घेऊन ये.
व्यक्ती - ए कोण तू? मी काही तुझा नोकर नाही.
दारूडा - मग कोण आहेस?
व्यक्ती - एअर कमांडर.
दारूडा - मग विमान घेऊन ये!

**आनंद**

बायको - मी मरणार आहे.
नवरा - मी पण मरीन मग.
बायको - का?
नवरा - एवढा आनंद मी सहन करू नाही शकत!

**एन्जॉय**

नवरा - आज रविवार. मला सुटी एन्जॉय करायचीय. त्यासाठी मी तीन तिकिटं आणली आहेत.
बायको - तीन का?
नवरा - तू आणि तुझ्या आई बाबांसाठी.

**झाकण हरवलं**

एक दारूडा रस्त्यात पडलेला असतो.
पोलीस - एवढी दारू का प्यायलास?
दारूडा - काय करणार साहेब, पर्यायच नव्हता.
पोलीस - का काय झालं?
दारूडा - बाटलीचं झाकणच हरवलं होतं.

चुकीची कॉपी

परीक्षा हॉलमध्ये,
शिक्षक - काय झालं बाबू टेन्शनमध्ये आहेस?
पट्टी नाही आणलीस? पेन विसरलं का? हॉल तिकीट हरवलं का?
बाबू - नाही हो, मी वेगळ्याच विषयाची चीट आणलीय.

# आरोग्य पुरवणी

**वेगवेगळ्या शीत पेयांमधील(Cold Drinks) अपायकारक तत्वांची (Pesticides) टक्केवारी**

Thumps Up – 15.2 %

Coco Cola – 13.4 %

Pepsi: - 10.9 %

Mirinda: - 10.7%

Fanta: - 9.1 %

7 up: - 2.5%

2.1 % पेक्षा जास्त टक्के Pesticide असल्यास ते यकृताला (liver) हानी पोहोचवू शकते. संडासातील पॉटवरील डाग काढण्यासाठी, घट्ट झालेले नट-बोल्ट सैल करण्यासाठी काही जण पेप्सी किंवा कोकचा वापर करतात. यामध्ये असलेले आम्ल (Acid) आपल्या दात व हाडांवर परिणाम करतं. काही लोक जेवल्यानंतर पेप्सी किंवा कोक पितात, यामुळे पचनक्रियेवर ताण पडतो. पोटातील अन्न आंबवले जाते. नंतर ते कुजते व त्यातील विषारी जिवाणू रक्ताद्वारे संपूर्ण शरीरात पसरतात आणि मग निरनिराळ्या रोगांना निमंत्रण देतात.

काही वर्षाअगोदर दिल्ली युनिवरसिटीमध्ये कॉलेजच्या मुलांची पैज लागली होती. "कोण जास्तीत जास्त कोका कोला पिऊन दाखवतो", जो मुलगा जिंकला त्याने आठ बाटल्या रिचवल्या आणि त्याच जागेवर (On the Spot) मरण पावला. त्याच्या पोस्ट मार्टेम रिपोर्ट मध्ये स्पष्ट झाले की त्याच्या रक्तात प्रमाणाबाहेर कार्बन डाय ऑक्साइड वाढलं होतं आणि ऑक्सिजन पुरेसा नव्हता.

तुटलेला दात पेप्सी किंवा कोकच्या बाटलीत ठेवा. दहा दिवसा नंतर त्याचा लवलेशही सापडणार नाही. दात आणि हाडे मरणांनंतर सुद्धा काही वर्षापर्यंत टिकून असतात. आता विचार करा की शीत पेये प्यायल्यामुळे आपण आपल्या शरीराची कशी वाट लावतोय?...

# History of Christmas

The term Christmas is derived from 'Cristes Maesse' which means the 'Mass of Christ'. It is a customary holiday in the English calendar and the most propitious day celebrated worldwide with great pomp and show on December 25th of every year. This day is observed as the birth anniversary of Lord Jesus Christ who was born at Bethlehem, considered as the land of Jews. Being the son of God and the originator of Christian religion, this day is rejoiced as a symbol of reverence to Lord Jesus. The celebrations go on for twelve days starting from 25th December to 6th January.

Many of the widely practiced traditions which incorporate Christmas trees, mistletoe, Christmas presents, and Santa Claus – are contemporary personifications of the most dissolute pagan traditions ever practiced on earth. The common phrase exchanged among Christians is “Merry Christmas”. Wishing someone Merry Christmas is simply wishing them a serene or sacred "Mass of Christ".

The notion of sharing and giving of presents will jog your memory into the gifts which were offered to Jesus. Some rituals are still widespread which has an eternal appeal. Like your mantel piece being decorated with stockings, and the house being decorated by vibrant lights.

The festival spread the meaning of cheerfulness, love and merry making. People usually come out of their houses and sing Christmas carols on the road. It’s a festival which brings together people from every corner of the world to spread the message of love and affection.

Historians argue that Christmas was first observed in Rome in 336 A.D. Early Romans, however, could not admit their religion honestly as Christianity had developed in blood and tears in Rome. The religion was adapted by masses later in the 4th century A.D. after the adaptation of Emperor Constantine to Christianity.

This society then felt the desire to rejoice the birth of Christ as a fiesta. It was seen that different communities had been observing Jesus's birth on different days like 6th January, 19th April, 20th May, 17th November, and 25th December. 25th

December was accepted as the preferred date by the 5th century A.D. in the Western World and steadily the Eastern Churches also followed the west.

Customarily the mid-winter has long been a time of celebration globally. Even before the advent of Jesus, many communities celebrated during the winter season.

**Christmas Decorations**

Be simple and give a personalized touch to your Christmas decorations. There are different types of attractive Christmas items with which you can embellish your house thus adding an exclusive touch to your celebrations. There are some traditional items which are used as part of the Christmas decorations.

- **Decorating your Christmas home** - Red and green are two colors which are customarily used for Christmas decorations. Since it is the brightest time of the year you can also go beyond these traditional colors. Make ribbon bows from vibrant colors and put them all across the wall. Make Christmas designs from cardboards, cloth and papers. Draw Santa Claus, Stars or stockings and put them all over the house. It is suggested to use tablecloths, painted in green and red or something that has Christmas designs on it.
- **Decorating your Christmas tree** – The most significant of all Christmas décor items is the Christmas tree. The size of the Christmas tree depends on the size of the room and catches the attention of all the guests. You should decorate your Christmas tree as vibrant as possible. The decoration pieces for the Christmas tree could be rings, bells and candies, being covered in decorated wrappers. Use battery operated lights or Christmas garlands for adorning the staircase and the walls. One can also place plants been lit up in the house. This way you can create an exclusive Christmas ambience in the house and make the festive occasion more colorful.
- **Lighting your Christmas home** – Avoid using electric lights. You could also utilize your imagination in decorating the fireplace in your house. Use the right combination of colors for decoration. Try to experiment with blue, mauve and copper lights. Candles are an important ingredient of Christmas festivity. You can stylishly pair them with colored candles which will ensure vibrant impact.

***Christmas Carols***

Knotted with the festivities are the Christmas Carols - the musical songs which adds vibrancy to the festive disposition. The librettos of the songs are inimitable, amusing, engaging and religious. But all in all it definitely adds to the appeal of the festivity. Some of the famous songs and carols are:

- Come All Ye Faithful
- God Rest You Merry Gentlemen
- Jingle Bells
- Rudolph the Red Nosed Reindeer
- Santa Claus is Coming to Town
- We Wish You a Merry Christmas
- Joy to the World
- Ave Maria
- A Child Is Born in Bethlehem
- Angels from the Realms of Glory

Christmas Gifts

The spirit of this day resides in giving and sharing. Gifting Christmas gifts to all your near and dear ones be it friends, family or colleague, forms a vital part of the celebrations. When presenting with a gift you also need to consider the likes and dislikes of the particular person you are gifting. You can gift your loved ones some things like:

- Beautiful Christmas Greeting Cards can be a fantastic way to wish someone on this day.
- Christmas Gift Baskets which generally contain dry fruits, cookies and chocolates are another gift items which when gifted can bring a smile on the face of that someone special.
- Wines are a popular gift item. Carry a good wine to your friend’s place which you can uncork during a sumptuous dinner.
- Other popular gift items which you can give on this special day are clothes, bags, electronic items, food items, and accessories. You can also plan to give something unique which is handmade.

*Christmas Food*

An essential part of the celebration is the food items which are exquisitely made for the special day. On this day your family and friends will cook some scrumptious dishes which will add to the merry making. A dinner of roast turkey or fruit mince pies can be a delightful meal on this day. So treat your guests to some amazing food and beverages like:

- Eggnog can be served to your guests. It is a very popular item which is a great punch and often people mix wine to it to make it into a delightful cocktail.
- Hot chocolate is also a popular drink which is given to the guests. This is very popular among the kids.
- Sugar cookies are also a favorite food items for this celebration.
- Gingerbread man is a trendy food item and is greatly popular among the children.
- Food items like ham, roasted duck, and roast turkey are hugely enjoyed during Christmas dinners. These food items are served with vegetables like onions, broccoli, potatoes, corn, and cranberry sauce.

# प्रेम आणि वेडेपणा

खूप वर्षापूर्वीची गोष्ट आहेजगाची उत्पती त्यावेळी झाली नव्हती . आणि मानवाने या जगात आपले पाऊल रोवले नव्हतेत्यावेळी सगळे सद्गुण आणि . दुर्गुण इकडे तिकडे फिरत होते.काय करावे हे न कळल्याने कंटाळले होते .

एक दिवस ते सगळे एकत्र जमून काय करावं याचा विचार करू लागलेत्यांना . खूपच कंटाळा आला होता इतक्यात .'कल्पकते' ला एक कल्पना सुचलीती म्हणाली ., "आपण सगळे लपंडाव खेळूया का?" सर्वांना ती कल्पना एकदम आवडलीलगेच वेडा . असणारा 'वेडेपणा' ओरडला, "मी आकडे मोजतोया वेडेपणाच्या मागे लागण्या ." एवढं कुणी वेडं नसल्याने सर्वांनी त्याच्या म्हणण्याला मान्यता दिली. 'वेडेपणा' एका झाडाला रेलून उभा राहिला आणि मोजू लागला,........ एक, दोन, तीन.............

वेडेपणाने आकडे मोजायला सुरुवात करताच सर्व सद्गुण व दुर्गुण लपायला गेले .'कोमलता' चंद्रकोरीच्या टोकांवर जाऊन बसली .'देशद्रोह' कचऱ्याच्या ढिगात लपला .'आपुलकी' नं स्वताला ढगांमध्ये गुंडाळल .'खोटेपणा' म्हणाला कि 'मी दगडाखाली लपेन'. पण त्याचं सांगणं खोटंच होतंप्रत्यक्ष तो एका . तळ्याच्या तळाशी लपला .'वासना' पृथ्वीच्या मध्यभागी लपली .'लोभ' एका पोत्यात शिरू लागला आणि शेवटी ते पोतं त्यानं फाडला . वेडेपणा आकडे मोजतच होता७९ ......, ८०, ८१, ८२......

बहुतेक सगळे सद्गुण, दुर्गुण वेगवेगळ्या ठिकाणी लपले होते अजून .'प्रेम' मात्र कुठे लपाव याचा निर्णय न घेता आल्याने लपू शकलं नव्हतंअर्थात . आपल्याला याचं आश्चर्य वाटायला नकोकारण आपल्याला माहित आहे कि ., 'प्रेम' लपवता येतचं नाही .'वेडेपणा' आकडे मोजत होताच९५ ..., ९६, ९७शेवटी .... शंभरावा आकडा उच्चारण्याची वेळ आली तेव्हा घाईघाईने 'प्रेमा' ने एका गुलाबच्या झाडत उडी मारून स्वताला लपवलंवेडेपणा . मी !मी येतोय" .ओरडला येतोय"!

'वेडेपणा' न सर्वांना शोधायला सुरुवात करताच आधी लगेच त्याच्या पायाशीच त्याला 'आळशीपणा' सापडलाकारण स्वताला लपवण्या एवढा उत्साह आणि शक्ती . त्याच्यात नव्हती नंतर त्याला चंद्रकोरीवरची .'कोमलता' दिसलीतळ्याच्या . तळातून त्याने 'खोटेपणा'

ला शोधले पृथ्वीच्या मध्यभागातून .'वासना' शोधून काढलीठोपाठ एक सगळे एकापा . शोधले, पण त्याला एकाचा शोध लागेनात्या एकाला . शोधता येईना म्हणून 'वेडेपणा' निराश झाला तेवढ्यात .'मत्सरा' ने, त्याला शोधता येत नाही या मत्सराने ग्रस्त होऊन त्या 'वेडेपणा' ला म्हटले, "अरे, तुला 'प्रेम' सापडत नाहीये ते त्या गुलाबाच्या झुडुपामागे . ."लपलंय 'वेडेपणा' ने एक लाकडाचा धारदार ढलपा घेतला आणि गुलाबाच्या झुडुपात तो भोसकलाशेवटी एक हृदयद्रावक किंकाळी ऐकू आली .अनेकदा ....दोनदा .....एकदा . तेव्हा तो थांबला त्या किंकाळीनंतर आपल्या चेहऱ्यावर हाथ झाकीत .'प्रेम' बाहेर आलंत्याच्या . प्रेमाला .रक्त ओघळत होतं बोटांच्या फटीतून शोधण्याच्या अधिर्तेमुळे 'वेडेपणा' ने त्या लाकडी ढलप्यान प्रेमाच्या डोळ्यांवर वर केले होतेवेडेपणा आक्रोश करू लागला ., "अरेरेमी ! हे काय केलं? काय केलं मी? मी तुला आंधळा करून टाकलंआता मी याची भरपाई कशी . करू? तुझे डोळे आता पूर्वीसारखे कसे करू?

प्रेम म्हणाले, "तू काही माझे डोळे परत देऊ शकणार नाहीसपण तुला जर . माझ्यासाठी काही करायचंच असेल तर तू माझा मार्गदर्शक हो".मला रस्ता दाखव .

तेव्हापासून प्रेम आंधळ झालं आणि वेडेपणा त्याचा नेहमीचा सोबती झाला

*(इंटरनेटवरून साभार)*

# तुझं पत्र यायचं म्हणून नाताळ यायचा

नाताळ आला
नाताळ गेला
जन्म संपून गेला तरी
आपल्याला नाही कळला.

तू आल्याचं
सर्वा आधी मेंढपाळांनाच कळलं
निवाऱ्यासाठी ठोठावलं होतं
आमचही दार
झोप लागली
तू येऊन गेल्याचं कळलच नाही.

अंतर वाढतच चाललयं
पूर्वी असं नव्हतं
माझ्याही अंगणात
उगवायचा तारा
आता टळून जाते रात्र
आणि आभाळ माझं कोरडं ठाक.

माझ्या हातातून
तुझा हात सुटला
तेव्हापासूनच हरवून गेलो बघ,
अजूनही मी मलाच नाही सापडलो !

यंदाचा हा कितवा नाताळ
मी मोजत बसलोय
तू जन्म घेतलास म्हणून
माझा मृत्यू टळला.

तू जन्म घेतोस
आणि संपून जाते एक वर्ष
संपून जाते माझं आयुष्य
म्हणूनच तू जन्म घेतोस

प्रत्येक नाताळात
तुझं पत्र यायचं
तुझं पत्र यायचं
म्हणूनच माझ्यासाठी नाताळ यायचा.

पिवळी पडली आहेत
शुभेच्छापत्र
विरळ झाले आहेत
आपल्यातले संबंध
डोक्यावरच्या केसासारखे

अजून ठेवलं आहे जपून
पहिलं शुभेच्छापत्रं
ज्यावर आहे
तुझ्या अक्षरातलं माझं नाव
तुला आठवतही नसेल
मी मात्र
विसरलो नाही माझं नाव
तुझं नाव

**श्री. सायमन मार्टिन**

# मायेचा हात

आपल्या देशात दरवर्षी बालदिन साजरा केला जातो, त्यादिवशी सर्व जण लहान बालकांना शुभेच्छा देतात  परंतु आजही दरवर्षी लाखो बालकांना जन्मण्या अगोदरच मारलं जात आहे .जे जन्माला येतात त्यापैकी कित्येक लाख कुपोषणाचे बळी ठरत आहेत,बालमजुरांची संख्या अनेक कोटींच्या घरात आहे.अनेकांना लैंगिक अत्याचार सहन करावा लागत आहे.उरलेली बच्चे कंपनी दप्तराच्या ओझ्याखाली दबलेली आहे.अशा सर्व छोट्या देवदूतांची वडीलधाऱ्यास विनंती

पायात माझ्या... मऊ मऊ मोजे
अन् खांदयावर भले मोठे दप्तराचे ओझे
ईवल्याशा पंखात माझ्या बळ नाही फार
कसा सोसवेल त्यांना तुमच्या स्वप्नांचा भार
शाळा, टयूशन,अभ्यास ,कष्ट हे अपार
जगता जगता मरतो मी वारंवार
नका दौडू मजला शर्यतीत फार
स्वीकारा मजला, तुम्ही माझा आधार
बालपण माझे नका करू दूर
मनी राहील माझ्या त्याची सदा हुरहूर
नका सांडू जीवन माझे तुम्ही असे व्यर्थ
शोधू दे मजला माझ्या जीवनाचा अर्थ
ऊन,पाऊस वारा अंगाखांद्यावर घेऊ द्या
निसर्गाचं कवतीक उघडया डोळ्यांनी बघुद्या
होईन मी मोठा आज नाहीतर उद्या
पाठीवर फक्त मायेचा हात राहू द्या.

**श्री. एमेल आल्मेडा**

**(सेंट ॲलॉयशीयस हायस्कूल मध्ये शिक्षक असलेले एमेल सर नवोदित लेखक आहेत.)**

# चारोळया

ए सी ऑफीसमध्ये बसून
घामाच्या धारा तो विसरला आहे
धुंद रात्री चिअर्सच्या घोषात
आईच्या दूधाचे मोल तो विसरला आहे

माणसासाठी कायदे बनविले जातात
पण सोयीच्या पळवाटाही ठेवल्या जातात
मग एखादा निष्पाप ख्रिस्त सुळी दिला जातो
आणि गुंड बारब्बा सन्मानाने तुरुंगाबाहेर येतो.

डोळ्यांच्या एका कोपऱ्यातून
नजर एक शोधत होती.
पण नजरानजर होताच
नजर चुकवत होती.

पूर्वी दारं उघडी, हृदयही उघडं
दुसऱ्यांच्या मदतीसाठी
आता प्रत्येक जण आपालल्या घरात, दार बंद
मी आणि माझं कुटुंब हाच माझा छंद

'मेन डोअर' वर 'वेलकम'चा स्टीकर
'डोअर मॅट'ही 'वेलकम'चीच
दाराला मात्र आतून कुलूप
स्वागताचे हे नवे आधुनिक रूप

एक घरकुल असावं छोटसं
नातीगोती सांभाळणारं, प्रेम देणारं
निर्जीव भिंतीतूनही प्रेमाचा शिडकाव करणारं
स्वप्नाच्या दुनियेतून प्रत्यक्षात अवतरणारं

**सुनिल सोकाळकर**

# सुविचार संग्रह

- सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो.
- क्षमा हीच एकमेव गोष्ट या जगात आहे; जी पापाचं रुपांतर पुण्यामध्ये करु शकेल.
- श्रद्धेच्या जोरावर असाध्य गोष्टीही साध्य करता येतात
- आज्ञा करण्यापूर्वी आज्ञा पाळायला शिका.
- हसण्याचं मोल काय आहे हे रडल्यावरच कळतं.
- हातावरील रेषेत दडलेले भविष्य बघू नका; त्याच हाताने कष्ठ करा व स्वतचे भविष्य : .घडवा
- संसारात एकमेकांच्या सुखापेक्षा दु.ख वाटून घेण्यात फ़ार मोठा आनंद असतो:
- समुद्रातील तुफ़ानापेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असताततती निर्माण होऊ देऊ . .नका
- शुन्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द ज्याच्या अंगी असते, तोच खरा कर्तृत्ववान होय.
- विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असते तर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते.
- मोती बनून शिंपल्यात राहण्यापेक्षा दवबिंदू होऊन चातकाची तहान भागविणे जास्त श्रेष्ठ.
- दुसऱ्याला सावली देण्यासाठी झाडाला स्वत.उन्हात उभं राहावं लागतं :
- जीवनाचा अर्थ विचारायचा असेल तर तो आकाशाला आणि समुद्राला विचारा.
- चारित्र्याचा विकास सुसंगतीत होतो आणि बुध्दीचा विकास एकांतात होतो.
- घोंगड्याने काम भागत असेल तर रेशमी वस्त्राचा हट्ट धरु नये.
- आपण चंदन असल्याची घोषणा चंदनाला कधीच करावी लागत नाहीत्याचा गंध . वाऱ्याबरोबर आपोआप पसरत जातो.
- अंधारच नसता तर चमकणाऱ्या ताऱ्यांना काही किंमतच उरली नसती.
- अपयश म्हणजे संकट नव्हे; आपल्याला योग्य मार्गावर आणणारे ते मार्गस्थ दगड आहेत.

- आपले सत्यस्वरुप सिध्द करण्यास सोन्याला अग्नीत शिरुन दिव्य करावे लागते व हिऱ्याला घणाचे घाव सोसावे लागते.
- प्रसिध्द व्यक्ती होण्यासाठी आयुष्यातला क्षण न क्षण कोणत्यातरी एका क्षेत्रात सतत उगळावा लगतो.
- जीवनातील काही पराभव हे विजयाहूनही अधिक श्रेष्ठ असतात.
- माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे तेच माझे म्हणा.
- शरीराला श्रमाकडे, बुध्दीला मनाकडे आणि ह्रदयाला भावनेकडे वळविणे म्हणजे शिक्षण.
- औदार्य म्हणजे तुमच्या क्षमतेपेक्षा अधिक देणं आणि आत्मसन्मान म्हणजे तुमच्या गरजेपेक्षा कमी घेणं.
- खरे असेल तेच बोलावे, उदात्त असेल तेच लिहावे, उपयोगी तेच शिकावे आणि देशाचे हीत ज्यात असेल तेच करावे.
- आपण पक्षाप्रमाणे आकाशात उडायला शिकलो, माशाप्रमाणे समुद्रात पोहायला शिकलो पण जमिनीवर माणसासारखे वागायला शिकलो का?

***(इंटरनेटवरुन साभार)***

# Happy New Year translated into almost any language

- Geseende Kerfees en 'n gelukkige nuwe jaar (Afrikaans)
- Gzuar Krishlindjet Vitin e Ri! (Albanian)
- E gueti Wnchte & E glecklichs Nej Johr! (Alsatian)
- Gozhqq Keshmish (Apache)
- I'D Miilad Said ous Sana Saida (Arabic)
- Bon Ndau! (Arans)
- Aba satho niw jari da'wisida bon (Arawak)
- Shenoraavor Nor Dari yev Pari Gaghand (Armenian)
- Tezze Iliniz Yahsi Olsun (Azeri)
- Mbung Mbung Krismie & Mbung Mbung Ngouh Suiie (Bandang)
- Zorionak eta Urte Berri On! (Basque)
- Winshuyu sa Svyatkami i z Novym godam! (Belorussian)
- Maugmang Capascuhan asin Masaganang Ba-gong Taon! (Bicolano)
- Prejeme Vam Vesele Vanoce a stastny Novy Rok (Czech)
- Vasel Koleda; Tchestita nova godina! (Bulgarian)
- Bon nadal i feli any nou! (Catalan)
- Seng Dan Fai Lok, Sang Nian Fai Lok (Cantonese)
- Malipayong Pasko ug Bulahang Bag-ong Tuig! (Cebuano)
- Danistayohihv & Aliheli'sdi Itse Udetiyvsadisv (Cherokee)
- Mwebare khuhika - Ha Noel (Chiga)
- Naadelik looan na looan blethen noweth (Cornish Gaelic)
- Bon Natale e Bon capu d' annu (Corsican)
- Sretan Božic (Croatian)
- Ni ti Burunya Chou & Mi ti yuun (Dagbani)
- Gldelig Jul og godt nytr (Danish)
- Miet puou yan dhiedh Banyda tene Yin (Dinka)
- Ufaaveri aa ahareh (Divehi)
- Chrismi a lekah Nguo Suieh (Dschang)
- Christmas-e- Shoma Mobarak (Duri)
- Vrolijk Kerstfeest en een Gelukkig Nieuwjaar! ('Merry Christmas and a Happy new Year' in Dutch)
- Colo sana wintom tiebeen (Egyptian)
- Gajan Kristnaskon & Bonan Novjaron (Esperanto)
- Rmsaid Juluphi Head uut aastat (Estonian)
- Gledhilig jl og eydnurikt nggjr! (Faroese)

- Sal-e no mubarak (Farsi)
- Me Nomuni na marau ni siga ni sucu dei na yabaki vou (Fijian)
- Hyv Joulua or Hauskaa Joulua (Finnish)
- Zalig Kerstfeest en Gelukkig nieuw jaar (Flemish)
- Joyeux Noel et Bonne Anne! (French)
- Noflike Krystdagen en in protte Lok en Seine yn it Nije Jier! (Frisian)
- Mangamgam Bawa a dawun sikua diaw amin (Gaddang)
- Mfiyawidi yaKrisimisa & Marago ghaMwaka waUpe (Gciriku)
- Gilotsavt Krist'es Shobas & Gilosavt akhal ts'els (Georgian)
- Frohe Weihnachten und ein glückliches Neues Jahr! (German)
- Kala Christougenna Kieftihismenos O Kenourios Chronos (Greek)
- Natal ni shub kaamnao & Saal Mubarak (Gujarati)
- Osusuku Omusa & Masuke Omwaka (Gwere)
- Barka da Kirsimatikuma Barka da Sabuwar Shekara! (Hausa)
- Mele Kalikimaka & Hauoli Makahiki Hou (Hawaiian)
- Waihuka na Noeli & Waihhuka n 'Omwaka (Haya)
- Mo'adim Lesimkha. Shanah Tova (Hebrew)
- Shubh Naya Baras (Hindi)
- Boldog Karácsonyi Ünnepeket & Boldog Új Évet! (Hungarian)
- Maphon au nitungawan. Apo Dios Kituwen baron di toon (Hungduan)
- nga Pascua (Ibanag)
- Gleileg Jl og Farsaelt Komandi r! (Icelandic)
- Ekelere m gi maka Keresimesi na ubochi izizi afo ozo (Igbo)
- Selamat Hari Natal & Selamat Tahun Baru (Indonesian)
- Nollaig Shona Dhuit (Irish Gaelic)
- Buon Natale e Felice Anno Nuovo (Italian)
- Shinnen omedeto. Kurisumasu Omedeto (Japanese)
- Sugeng Natal lan warsa enggal (Javanese)
- Assegwas ameggaz (Kabyle)
- Kotobian Tadau Do Krimas om Toun Vagu (Kadazan)
- Ithiwa na Kisimsi Kiseo & Na Mwaka Mweu Museo (Kamba)
- Krismas basuk & Snem thymmai basuk (Khasi)
- Umunsi Mwiza (Kinyarwanda)
- Noeli Nziza & Umwaka Mwiza (Kirundi)
- Isangle Krismen & Isangle beng i fue (Kom)
- Sung Tan Chuk Ha (Korean)
- Tok Tapeng & Engan ya sasu (Kosraean)
- Appi Krismes en Appi Niu Yaa (Krio)
- A Bona Lukara na Kinakava (Kuanua)
- Seva piroz sahibe u sersala te piroz be (Kurdish)
- Kerekemisa zongwa & Erago moMumvho gomupe (Kwangali)

- JangI jIlIngIz guttuu bolsun! (Kurghiz)
- Pax hominibus bonae voluntatis (Latin)
- Prieci'gus Ziemsve'tkus un Laimi'gu Jauno Gadu! (Latvian)
- Linksmu Kaledu ir laimingu Nauju metu (Lithuanian)
- Amazalibwa Agesanyu & N'Omwaka Omujaa Ogwemirembe (Luganda)
- Schi Krschtdeeg an e Schint Ni Joer (Luxembourgeois)
- Streken Bozhik (Macedonian)
- Pada salamet sabhala bengko areja (Madura)
- Arahaba tratry ny Krismasy (Malagasy)
- Selamat Hari Natal (Malayan)
- Nixtieklek Milied tajjeb u is-sena t-tabja! (Maltese)
- Kung His Hsin Nien bing Chu Shen Tan (Mandarin)
- Mepiya Pagasaulog sa pagka-otawni Jesus aw maontong kaling Omay! (Mandobo)
- Mayad paq Pasko kag (Mangyan)
- Nollick ghennal as blein vie noa (Manx - *the language of the Isle of Man*)
- Kia orana e kia manuia rava i teia Kiritimeti e te Mataiti Ou (Maori)
- Shub Naya Varsh (Marathi)
- Zul saryn bolon shine ony mend devshuulye (Mongolian)
- Okrismesa iwa & Omude Mupe wa Punikwa (Ndonga)
- Krist Yesu Ko Shuva Janma Utsav Ko Upalaxhma Hardik Shuva & Naya Barsa Ko harkik Shuvakamana (Nepali)
- Eg ynskjer hermed Dykk alle einGod Jul og Godt Nyttr (Norweigan)
- Polit nadal e bona annada (Occitan)
- Niibaa' anami'egiizhigad & Aabita Biboon (Ojibwe)
- Ungil Kurismas (Palauan)
- De Christmas akhtar de bakhtawar au newai kal de mubarak sha (Pashtu)
- Wesolych Swiat i Szczesliwego Nowego Roku (Polish)
- Boas Festas e um feliz Ano Novo (Portuguese)
- Nave sal di mubaraka (Punjabi)
- Sumaj kausay kachun Navidad ch'sisipi & Mosoi Watapi sumaj kausaykachun (Quechua)
- Kia akakakaia te Atua i runga i te rangi Teitei, e ei au to to teianei ao, e kia aroaia mai te tangata nei (Raorotongan)
- Bachtalo krecunu Thaj Bachtalo Nevo Bers (Romani)
- Craciun fericit si un An Nou fericit! (Romanian)
- Mei kathui nata neila mei Khrisrmas akhatni gai mei tingkum kathan tu-na arew we (Rongmei)
- Pozdrevlyayu s prazdnikom Rozhdestva i s Novim Godom (Russian)
- Maligayang Pasko at Masayang Ba-yon Taon! (Sambal)
- Muwule Omwaka Enjaya (Saamia)
- La Maunia Le Kilisimasi Ma Le Tausaga Fou (Samoan)
- Raska nawa Serma (Santali)

- Bonu nadale e prosperu annu nou (Sardinian)
- Nollaig chridheil agus Bliadhna mhath ur! (Scotish Gaelic)
- Sretam Bozic. Vesela Nova Godina (Serbian)
- Bon Natali e Prosperu Annu Novu (Sicilian)
- Subha nath thalak Vewa. Subha Aluth Awrudhak Vewa (Sinhaese)
- Kutandika kua Yesu kuibuwa! & Kipua kipia kibuwa! (Songe)
- Newroz le to Piroz be (Sorani)
- Wjesole hody a strowe Nowe leto (Serbian)
- ciid wanaagsan iyo sanad cusub oo fiican (Somali)
- Vesele Vianoce a stastny novy rok (Slovakian)
- Vesele bozicne praznike in srecno novo leto (Slovenian)
- Feliz Navidad (Spanish)
- Wilujeng Natal Sareng Warsa Enggal (Sudanese)
- Malipayon na pasko sanan bag-on tuig! (Surigaonon)
- Krismas Njema Na Heri Za Mwaka Mpya (Swahili)
- God Jul och Gott Nytt r (Swedish)
- Maligayang Pasko at Manigong Bagong Taon ( Tagalog)
- Ia ora i te Noera & Ia orana i te matahiti 'ap (Tahitian)
- Nathar Puthu Varuda Valthukkal (Tamil)
- Suksan Wan Christmas lae Sawadee Pee Mai (Thai)
- Xristos Khuwdziti kax sh kaxtoolxetl (Tlingit)
- Ke whakamanuia te Kirihimahi & Tauhaga Fou fiafia (Tokelau)
- Kristo abe anduwe muciindo ca Christmas (Tongan)
- Keresemose o monate le masego a ngwaga o montsha (Tswana)
- Noeliniz ve Yeni Yiliniz Kutlu Olsun (Turkish)
- Veseloho Vam Rizdva i Shchastlyvoho Novoho Roku! (Ukrainian)
- Naya Saal Mubarak Ho (Urdu)
- YanghI yiling ahlqIs bolgey! (Uyghur)
- Chuc Mung Giang Sinh - Chuc Mung Tan Nien (Vietnamese)
- Maupay nga Pasko ngan Mainuswagon nga Bag-o nga Tuig! (Waray-Waray)
- Nadolig Llawen a Blwyddyn Newydd Dda (Welsh)
- Siniqwenelela Ikrisimesi EmnandI Nonyaka Omtsha Ozele Iintsikelelo Namathamsanqa (Xhosa)
- Gute Vaynakhtn un a Gut Nay Yor (Yiddish)
- E ku odun, e hu iye' dun! (Yoruba)
- Barka da Issa hay-yan hann & Barka da djiri barey-yan (Zarma)
- Newroz'a tu Piroz be (Zaza)
- Sinifesela Ukhisimusi Omuhle Nonyaka Omusha Onempumelelo (Zulu)

# संपर्क

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास खालील पत्त्यांवर ई-मेल करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com

१वसई :- admin@onevasai.com

# अभिप्राय

आपला अभिप्राय जरूर नोंदवा, आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला जरूर कळवा

# आभार

आमचे सर्व लेखक, कवि, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे ख्रिस्तायन तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.